रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ अंक १९३
www.ramprahar.com

बुधवार, २९ जानेवारी २०२५ ◆पाने ८◆ किंमत ₹२

## अंतरंग

पनवेलमध्ये मराठी कुटुंबावर घर रिकामे करण्याचा दबाव/२

अंगणवाडीच्या पोषण आहारात आढळला मेलेला उंदीर/५

भारतीय महिला संघाची सेमी फायनलमध्ये धडक/८

### जसप्रीत बुमराहला आयसीसीचा सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू पुरस्कार



**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या वार्षिक पुरस्कारांच्या सर्व विजेत्यांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. आयसीसी क्रिकेटर ऑफ द इयरची क्रिकेट चाहत्यांना सर्वाधिक प्रतीक्षा होती. यात भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहसह इंग्लंडचा फलंदाज जो रूट, हॅरी ब्रूक आणि ऑस्ट्रेलियाचा फलंदाज ट्रेव्हिस हेड यांचा समावेश होता. त्यातून भारताचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराहला यंदाचा सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू म्हणून पुरस्कार देण्यात आला. जसप्रीतला गेल्या वर्षी उत्कृष्ट कामगिरीसाठी आयसीसी क्रिकेटर ऑफ द इयर तसेच आयसीसी टेस्ट क्रिकेटर ऑफ द इयर म्हणून निवडण्यात आले आहे. भारतीय वेगवान गोलंदाजाने हे आयसीसी पुरस्कार जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. एका वर्षात दोन आयसीसी पुरस्कार जिंकणारा बुमराह जगातील केवळ तिसरा गोलंदाज ठरला आहे.

# ‘जीबीएस’साठी राज्यभर उपचार सुविधा द्या

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आरोग्य विभागाला आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

गुईलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयात विशेष व्यवस्था निर्माण करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि.२८) दिल्या. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत गुईलेन बॅरे सिंड्रोमच्या आजाराबाबत आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या. बैठकीत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने गुईलेन बॅरे सिंड्रोमच्या आजाराबाबत सादरीकरण करण्यात आले.





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, सध्या रुग्णांवर उपचार सुरू आहेत, मात्र रुग्णांना योग्य प्रकारे उपचार मिळावेत यासाठी शासकीय रुग्णालयात विशेष व्यवस्था करावी. या आजारावर केले जाणारे उपचार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट आहेत. अजून काही प्रक्रिया करायची असल्यास सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने करावी.

हा आजार दूषित पाण्यामुळे आणि न शिजवलेले अन्न, मांस खाल्ल्यामुळे होतो. त्यामुळे अशाप्रकारचे अन्न टाळावे, पाणी उकळून पिण्याबाबत नागरिकांना आवाहन करावे. पुण्यात ३१ तारखेला क्रिकेट सामना आहे. त्यावेळी पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरोग्य विभागाला केली.

पुणे शहरांतील रुग्णांवर उपचारासाठी पुणे महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात तर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण मेमोरियल रुग्णालयात उपचार करण्याची सूचना करण्यात आली आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

हा आजार दुर्मीळ आहे पण बहुतेक रुग्ण बरे होतात. हा आजार संसर्गजन्य नाही, प्रतिकारशक्ती कमी झाल्याने हा आजार होतो. याबाबत पुण्यात आढावा घेतला आहे. उपचार आणि तपासणी बाबतच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, दोन्ही महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने कार्यवाही सुरू आहे, असे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

पुण्यात सध्या १११ रुग्ण आहेत, ८० रुग्ण पाच किमीच्या परिघातील आहेत. ३५,००० घरे आणि ९४,००० नागरिकाच्या चाचण्या घेण्यात आल्या आहेत. एक मृत्यू झाला तो अद्याप जीबीएसमुळेच झाला याची अजून पुष्टी नाही, असे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

## एका ग्रामसेवकाकडून उरणच्या तीन ग्रामपंचायतींमध्ये लाखोंचा गैरव्यवहार

### केगाव, चाणजे, बांधपाडा गावात अपहार; गुन्हा दाखल

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींमध्ये लाखों रुपयांचा अपहारप्रकरणी ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील यांच्याविरोधात उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांच्या तक्रारीनंतर उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उरण तालुक्यातील केगाव, चाणजे व बांधपाडा या तीन ग्रामपंचायतींमध्ये २२ जानेवारी २०१९ ते २६ एप्रिल २०२३ यादरम्यान वैभव पाटील ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत होते.



ग्रामसेवक वैभव पाटील

या तीनही ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत असताना वैभव पाटील यांनी बनावट कागदपत्रे, बिले, निधीचा विनियोग, नियमबाह्य खर्च, ग्रामपंचायतीची जमा झालेल्या रक्कम बँकेत भरणा न करणे, कामात मनमानी, हलगर्जीपणा करणे आदी गैरप्रकार केले असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे केलेल्या होत्या. याप्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याची मागणीही अनेक तक्रारदारांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे केली होती.

ग्रामस्थांच्या तक्रारींची दखल घेऊन गटविकास अधिकाऱ्यांनी वैभव पाटील यांची चौकशी सुरू केली होती. या खातेनिहाय चौकशीत तीनही ग्रामपंचायतींमध्ये लाखो रुपयांचा अपहार झाल्याचे आढळून आले आहे. त्याची दखल घेऊन उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांनी उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेऊन ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


याप्रकरणी तपास सुरू करण्यात आला असल्याची माहिती शेवा बंदर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विशाल नेहूल यांनी दिली आहे.

## सिद्धिविनायक मंदिरात दर्शनासाठी ड्रेस कोड

**मुंबई : प्रतिनिधी**

असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सिद्धिविनायकाचे दर्शन घेण्यासाठी आता ड्रेस कोड पाळावा लागणार आहे. काही भाविकांच्या तक्रारींनंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे न्यासच्या वतीने सांगण्यात आले आहे. त्याचबरोबर प्लास्टिक बंदीचाही निर्णय घेण्यात आला आहे.

राहुल लोंढे म्हणाले की, मंडळाच्या विश्वस्तांची बैठक झाली. मंदिरात ड्रेस कोड लागू करण्याचा निर्णय बैठकीत घेतला आहे. काही भक्तांच्या तक्रारी, तर काहींच्या सूचना न्यासकडे आल्या होत्या. मंदिरात काही भाविक येतात.



ते कुठल्या जातीचे, धर्माचे पंथाचे असतील. स्त्री असो वा पुरुष. अनेकांचे पेहराव हे समोरच्या व्यक्तींना संकोच वाटेल असे होते.

काही भाविक कसेही पेहराव करून येतात. त्यामुळे आम्ही निर्णय घेतला आहे की, पुढच्या आठवड्यापासून सिद्धिविनायक मंदिरात येणारा जो भक्त असेल, त्याचा पेहराव शालीनता आणि पावित्र्य जपणारा असावा. आपण मंदिरात येऊन श्रीगणेशाचे दर्शन घेतोय. त्याचे पावित्र्य जपले जाईल, अशा प्रकारचा पेहराव भाविकांचा असायला हवा, अशी माहिती लोंढे यांनी दिली.

## वावंजे, मानपाडा येथे विकासकामांचे भूमिपूजन

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघातील वावंजे निताळे आणि मानपाडा कातकरी वाडी येथे मंगळवारी (दि.२८) भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते जलजीवन मिशन योजनेंतर्गत येणाऱ्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

**(पान २ वर..)**

## निवडक

### केजरीवाल सरकारकडून हजारोंचा भ्रष्टाचार –ना. शाह

**नवी दिल्ली :** गृहमंत्री अमित शाह दिल्लीमध्ये एका रोड शो दरम्यान म्हणाले की, केजरीवाल सरकारने हजारोंचा भ्रष्टाचार केला आहे आणि दिलेली आश्वासने मोडली आहेत. शाह म्हणाले, ते म्हणाले होते, गाडी घेणार नाही. त्यांनी गाडी घेतली. ते म्हणाले होते, बंगला घेणार नाही, पण त्यांनी बंगलाही घेतला. सर्व सुविधा घेतल्या. त्यांनी भ्रष्टाचार केला आहे.

### नवदाम्पत्याला विठुरायाचे थेट दर्शन मिळणार

**आळंदी :** आषाढी–एकादशीसह इतरही दिवशी पंढरपुरातील विठुरायाच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने गर्दी करतात. या गर्दीमुळे मंदिर समितीने घेतलेल्या निर्णयांनुसार नव्याने लग्न केलेल्या जोडप्यांना विठ्ठलाचे थेट दर्शन घेता येणार आहे. त्यांना रांगेत उभे राहण्याची गरज पडणार नाही.

## उत्तर प्रदेशात धार्मिक कार्यक्रमात स्टेज कोसळून सात जण ठार

**बागपत : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशमधील बागपतमध्ये मंगळवारी (दि.२८) एक मोठी दुर्घटना घडली आहे. बागपतमध्ये एका धार्मिक कार्यक्रमात स्टेज कोसळून झालेल्या दुर्घटनेत सात जण ठार झाले आहेत, तर ४० पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. तसेच ५० पेक्षा जास्त भाविक स्टेजखाली दबल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**५०हून अधिक नागरिक जखमी**

या घटनेनंतर या ठिकाणी चेंगराचेंगरी सदृष्य परिस्थिती निर्माण झाली होती. या घटनेत जखमी झालेल्या भाविकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

बागपत येथे मंगळवारी जैन निर्वाण उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवासाठी मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले होते. या वेळी भगवान आदिनाथांच्या निर्वाण लाडू उत्सवात मनस्तंभ संकुलात तात्पुरते उभारलेले लाकडी व्यासपीठ अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला तर ४० पेक्षा जास्त जण जखमी झाले. या अचानक घडलेल्या दुर्घटनेनंतर त्या ठिकाणी मोठा गोंधळ उडाला होता.

जखमी झालेल्या भाविकांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत तसेच या घटनेची माहिती मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घेतली असून योग्य त्या सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

## क्रिकेट स्पर्धा



**पनवेल :** भाजप युवा मोर्चाच्या वतीने कै. दशरथ शेळके स्मृती चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. २७ ते ३१ जानेवारीदरम्यान तालुक्यातील चिंचवली येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात हे सामने खेळवले जाणार आहेत. महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी समीर ठाकूर, दशरथ भोपी, रमेश पाटील, सखाराम चौधरी, अविनाश शेळके, विठ्ठल शेळके, दिनेश केळकर, सुरज म्हात्रे, संतोष शेळके, जगदीश शेळके, नामदेव ठाकूर, संदेश शेळके, साईनाथ शेळके, आत्माराम शेळके, सुरज शेळके, वामन शेळके, विश्वनाथ शेळके, विनायक भगत आदी उपस्थित होते.

## मुंबईत दुहेरी हत्याकांड

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील कांदिवलीत एका व्यक्तीने पत्नी आणि १० वर्षाच्या मुलाची हत्या केली आहे. आरोपीने पत्नी आणि मुलाची हत्या केल्यानंतर त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा बनाव पोलिसांनी उघडकीस आणला.

शिवशंकर दत्ता (वय ४०) असे आरोपीचे नाव आहे. त्याने पत्नी पुष्पा दत्ता (वय ३६) आणि दहा वर्षाच्या मुलाची हत्या केली. आरोपी शिवशंकर दत्ताने आधी पोलिसांना सांगितले होते की, पत्नी पुष्पा हिचे अवैध संबंध असल्याचा त्याला संशय होता. त्यामुळे त्याने पत्नीची हत्या केली, पण पत्नीची हत्या करताना त्याला १० वर्षाच्या मुलाने बघितले. त्यामुळे मुलाचाही गळा घोटला.

# शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रासह क्रीडा क्षेत्रातही उत्तुंग भरारी घ्या –लोकनेते रामशेठ ठाकूर

### गव्हाण विद्यालयात स्नेहसंमेलन, पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शैक्षणिक गुणवत्ता आणि सांस्कृतिक क्षेत्रासह क्रीडा क्षेत्रातही उत्तुंग भरारी घ्यावी, असे आवाहन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले. ते त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमलन कार्यक्रमात बोलत होते.





रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी संचलित अनिवासी गुरुकुल प्रकल्पांतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात झाला. विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या समारंभात कला, शालेय क्रीडा,वक्तृत्व व नमो चषक क्रीडा व इतर विविध शालेय, विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

विद्यालयाचे उपशिक्षक व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांनी विविध पारितोषिके प्राप्त केल्याबद्दल आणि शाखेसाठी दिलेल्या विशेष योगदानाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

बक्षीस वितरण समारंभात संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व विद्यालयाचे आधारस्तंभ लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांनी अध्यक्षीय भाषणात आपल्या शालेय जीवनातल्या आठवणी आणि काही प्रसंग तसेच विद्यालयाच्या जडणघडणीचा आढावा घेतला. तसेच उलवे–गव्हाण कोपर पंचक्रोशीच्या किंबहुना रायगड जिल्ह्याच्या लौकिकात भर टाकणाऱ्या सेक्टर १२ येथे नव्याने उभारलेल्या रामशेठ ठाकूर क्रीडांगणाचा विद्यालयातील विद्यार्थ्यांनी निश्चित लाभ घेवून शैक्षणिक गुणवत्ता आणि सांस्कृतिक क्षेत्रासह क्रीडा क्षेत्रातही उत्तुंग भरारी घ्यावी, असे आवाहन करून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी विचारांनी प्रभावित केले. विविध क्षेत्रात नैपुण्य प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे माननीय लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्ष भाषणात विशेष कौतुक केले. **(पान २ वर..)**

### विद्यालयास १० इंटरॅक्टिव्ह बोर्ड देणार

एम.एन.एम.विद्यालयासही १० इंटरॅक्टीव्ह बोर्ड एकूण २० इंटरक्टिव्ह बोर्ड (अंदाजे किंमत १८ लाख रुपये) देणार असून या दोन्ही विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने आता अधिक गुणवत्तापूर्ण शिक्षण घेणे सुलभ होईल असे प्रतिपादन या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.

## राज्य शासनातर्फे आंतरराष्ट्रीय दर्जाचा मराठी चित्रपट महोत्सव

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी चित्रपट क्षेत्राला बळ देण्यासाठी यावर्षीपासून राज्य शासन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करणार असल्याची घोषणा सांस्कृतिक मंत्री अ‍ॅड.आशिष शेलार यांनी पत्रकार परिषदेत केली. त्याचबरोबर राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या प्राथमिक फेरीची नामांकने व तांत्रिक व बालकलाकार विभागातले पुरस्कार जाहीर करण्यात आले.

मागील ६० वर्षापासून राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येतो. राज्यात विविध ठिकाणी विविध संस्थांच्या मार्फत आंतरराष्ट्रीय चित्रपटांचे आयोजन केले जाते. अशा संस्थांना १० लाखांपासून चार कोटीपर्यंत शासन अर्थसहाय्य करते. यावर्षीपासून मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्याची संकल्पना ना. शेलार यांनी मांडली, त्याला आता मुर्त स्वरूप आले आहे. यावर्षीचा हा पहिला चित्रपट महोत्सव मुंबईत होणार असून तीन दिवसांचा हा महोत्सव असेल. जे मराठी चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहचत नाहीत असे चित्रपट या महोत्सवात दाखविण्यात येतील.



प्रत्येक चित्रपटासोबत त्या चित्रपटाची टीम उपस्थित असेल जी थेट दर्शकांशी संवाद साधेल, या निमित्त काही विशेष परिसंवाद व या विषयातील अभ्यासकांच्या मुलाखती अशा आंतरराष्ट्रीय मानकांच्या स्वरूपात राज्याचा मराठी चित्रपट महोत्सव आयोजित केला जाणार आहे.

या महोत्सवात दर्जेदार मराठी चित्रपटांचा आस्वाद घेण्याची संधी चित्रपट रसिकांना मिळणार आहे. याबाबतची अंमलबजावणी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे.

# पनवेलमध्ये मराठी कुटुंबावर घर रिकामे करण्याचा दबाव

## मनसेकडून खळखट्याक!



पनवेल : रामप्रहर वृत्त

डोंबिवली नंतर आता पनवेलमध्येही मराठीवरून वाद झाल्याचे समोर आले आहे. खोलीचे करार संपल्यानंतरही घरात राहणाऱ्या एका मराठी कुटुंबाला त्या सोसायटीच्या चेअरमनकडून शिविगाळ केल्याचा दावा या मराठी कुटुंबियांकडून केला जातोय. याप्रकरणी त्यांनी स्थानिक मनसे पदाधिकाऱ्यांकडे तक्रार केली असून व्हिडिओद्वारे त्यांची हकिकतही मांडली आहे.

पनवेलमधील भोकरपाडा भागातील हिरानंदानी सोसायटीत खोली भाड्याने घेऊन राहणाऱ्या कुटुंबाला त्रास दिला जात असल्याचा आरोप गायकवाड कुटुंबाने केलाय. इथे हे कुटुंब भाड्याने राहत होतं. त्यांचं कॉन्ट्रॅक्ट संपल्यावर ते दुसऱ्या रुमची शोधाशोध करत असल्याने त्यांनी त्या संदर्भात घर मालकाला कळवलं होतं, त्यांचं मुल लहान असल्याने घरमालकाने त्यांना राहण्याची परवानगी दिली होती, तरीही या सोसायटीच्या महिला चेअरमनकडून रुम सोडण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा आरोप केला गेलाय. शिवाय भांडण करुन मराठी माणसांनी इथे राहण्याची लायकी नाही असं म्हणत शिविगाळ केली गेल्याचं गायकवाड कुटुंबाचं म्हणणं आहे.

या वादात गायकवाड यांना ह्दयाचा त्रास होऊ लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करावं लागलं. या घटनेची माहिती मिळताच मनसेने जाब विचारला, मनसेच्या रायगड जिल्हाध्यक्ष अदिती सोनार व त्यांच्या कार्यकर्त्यांनी मराठी माणसांवर होत असलेल्या अरेरावीचा जाब विचारला. त्यानंतर सोसायटीतल्या इतर मराठी रहिवाशांनीही याच स्वरुपाच्या तक्रारी केल्यात. परिणामी चेअरमन वसुंधरा शर्मा महिलेने सर्वांचीच माफी मागितली आहे व यापुढे एकाही मराठी कुटुंब किंवा भाडेकरू कुटुंबांना त्रास देणार नाही याची कबुली दिली आहे.

**व्हिडिओत काय ऐकू येतंय?**

तुम्ही गेटच्या बाहेर जा, तुम्ही गेटच्या आतमध्ये नको, असं ती महिला म्हणत होती. मी पाच महिन्याच्या बाळाला घेऊन कुठे जाऊ? असा पीडित महिलेने विचारला. तर, दोन टक्क्यांचा मराठी माणूस, तुमची हिरानंदनीमध्ये राहण्याची लायकी असंही या महिला चेअरमनने म्हटलं. त्यांनी आतापर्यंत तीन ते चार मराठी कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकलं आहे, अशी माहिती मनसे पदाधिकाऱ्यांनी दिली.

## अटल सेतूवर सध्याच्याच सवलतीच्या दराने आणखी एक वर्षभर पथकर आकारणी

मुंबई : प्रतिनिधी

अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूवर सध्या सुरू असलेल्या सवलतीच्या दरानेच आणखी एक वर्षभर पथकर आकारणी करण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूच्या वापराकरिता यापुर्वी ४ जानेवारी २०२४ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत एमएमआरडीएने प्रस्तावित केलेल्या दराच्या ५० टक्के सवलतीच्या दराने पथकर (कमीत कमी २५० रुपये इतका) आकारणीचा निर्णय घेण्यात आला होता. या दराचा एक वर्षानंतर आढावा घेण्याचा निर्णयही घेण्यात आला होता. त्यानुसार आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आणखी एक वर्षभर म्हणजेच ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सध्या सुरु असलेल्या सवलतीच्या दरानेच पथकर आकारणीस मान्यता देण्यात आली.

मुंबई महानगर विकास प्राधिकरणातर्फे उभारण्यात आलेला हा सुमारे २२ किलोमीटर लांबीचा अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू प्रकल्प १३ जानेवारी २०२४ पासून सार्वजनिक वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.



## घरफोड्या करणाऱ्या दोघांना मध्यप्रदेशात केले जेरबंद

### गुन्हयांची कबुली, साडेपाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत

अलिबाग : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील चार घरफोड्यांचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला यश आले आहे. या प्रकरणी दोघांची मध्यप्रदेशात जावून गठडी वळली आहे. त्यांनी चार गुन्ह्यांची कबुली दिली असून त्यांच्याकडून ५ लाख ५७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

रेवसिंग सुरसिंग भुरिया आणि दिनेश दुलसिंग मिनवा अशी आरोपींची नावे आहेत. ते मुळचे मध्यप्रदेशातील धार जिल्ह्यातील रहिवासी आहेत. त्यांनी पोयनाड, अलिबाग आणि नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत चार घरफोड्या केल्याचे कबुल केले आहे. त्यांच्याकडून घरफोडी करुन लुटलेला साडेपाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नरे, सरगर, हेड कॉन्स्टेबल अमोल हंबीर, प्रतीक सावंत, रवींद्र मुंडे, जितेंद्र चव्हाण, अक्षय पाटील, सचिन वावेकर, राकेश म्हात्रे,कॉन्स्टेबल राकेश लांबोटे यांनी या कारवाईत भाग घेतला. सायबर सेल मध्य प्रदेशचे प्रभारी प्रशांत गुंजाळ व पोलीस कॉन्स्टेबल भानुप्रतापसिंग राजपूत यांनी मोलाचे सहकार्य केले.

अलिबाग, पेण, रोहा उपविभागातील चोऱ्या,घरफोड्यांचा समांतर तपास करण्याचे आदेश वरिष्ठांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. तपासादरम्यान हेड कॉन्स्टेबल प्रतिक सावंत यांनी तांत्रिक तपास व गोपनीय बातमीदारामार्फत माहीती काढुन घरफोडी करणारे आरोपी हे मध्यप्रदेश राज्यातील धार जिल्ह्यातील असल्याचे निष्पन्न केले. या आरोपींना पकडणे कामे स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे कडील तपास पथक रवाना करण्यात आले. या तपास पथकाने मध्यप्रदेश राज्यातील धार जिल्ह्यातील कुक्षी गावात जाऊन आरोपींना जेरबंद केले.



## अलिबागमध्ये शुक्रवारी सहकार दिंडीचे आयोजन

अलिबाग : प्रतिनिधी

युनोने २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष जाहीर केले आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमांचा भाग म्हणून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सहकार दिंडी चे आयोजन करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यात अलिबाग येथे शुक्रवारी (दि. ३१) सहकार दिंडी काढण्यात येणार आहे. या दिंडीमध्ये सर्व सहकारी संस्था सहभागी होणार आहेत.

राज्यातून मुंबई व नागपूर येथून सहकार दिंडी निघणार आहे. ३० जानेवारी रोजी मुंबई येथून सहकार महर्षी धनंजयराव गाडगीळ यांच्या नावाची दिंडी निघणार आहे. अलिबागमध्ये ३० जानेवारी रोजी सायंकाळी सहकार दिंडीचे आगमन होईल. ३१ जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजता अलिबाग मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून दिंडीची सुरुवात होईल. महावीर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, ठिकरुळनाका, रायगड बाजार या मार्गाने ही दिंडी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयात पोहचेल. तेथे सांगता समारंभ होईल.

त्यानंतर ही दिंडी महाड कडे रवाना होईल. सहकार विभागाचे कर्मचारी, या सहकार दिंडीमध्ये सहभागी होणार आहेत.

## नेरूळमध्ये सहा बांगलादेशी नागरिकांना अटक

नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार

नेरुळ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रह्मनंद नाईकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी सकाळी केलेल्या शोध मोहीम कारवाईत सहा बांगलादेशी पुरुषांना अटक केली आहे. त्यांची अधिक चौकशी केली असता त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्र असून मागील वर्षभरापासून नवी मुंबई शहरात वास्तव्यास असल्याचे पोलिसांनी सांगितले. यापूर्वी देखील शिरवणे गावातील विशेष शोध मोहिमेत तीन बांगलादेशी नागरिकांना नेरुळ पोलिसांनी अटक केली होती.




नेरुळ विभागातील प्रशांत कॉर्नरच्या पाठीमागे कुकशेत, सेक्टर १४ येथे सी रिजन्सी या विकासकाची बांधकाम साईट सुरु आहे. या साईटवरील संबंधित लेबर ठेकेदाराने आपल्या कामावर काही बांगलादेशी कामगार कामावर ठेवले असल्याची गुप्त माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. त्यानुसार नेरुळ पोलिस ठाण्याचे वपोनी ब्रह्मनंद नाईकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक आकाश ठाकरे आणि पोलीस पथकानी मंगळवारी सकाळी सापळा रचून सदर बांधकाम साईटवर काम करीत असलेल्या कामगारांची तपासणी केला असता सदर साईटवर ६ बांगलादेशी पुरुष असल्याचे आढळून आले. त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्र आढळून आले नसून मागील वर्षभर ते शहरात वास्तव्यास असल्याचे पोलिसांनी सांगितले. नेरुळ पोलिसांनी १० दिवसापूर्वी शिरवणे गावात केलेल्या

एका शोध तपासणी मोहिमेत ३ बांगलादेशी नागरिक असल्याचे आढळून आले होते. दरम्यान नवी मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात रिडेव्हलपमेंटची कामे सुरु आहेत. त्यामुळे इथं कामगारांची मोठी मागणी आहे. मागील वर्षीदेखील नवी मुंबई पोलीस ठाणे अंतर्गत केलेल्या शोध मोहिमेत ४७ बांगलादेशी नागरिकांना अटक केली होती असे सूत्रांनी सांगितले.

## योगामुळे मनाची एकाग्रता, स्मरणशक्ती वाढते

कर्जत : प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक कडाव शाळेमध्ये महाराष्ट्र योगशिक्षक संघाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमायवेळी बोलताना गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड यांनी 'मनावर कंट्रोल ठेवण्याचा मार्ग म्हणजे योग, तुम्ही जी काही गोष्ट कराल ती तुमच्या चिरकाल स्मरणात राहते म्हणून योगामुळे मनाची एकाग्रता वाढते.' असे प्रतिपादन केले.

या वेळी योगशिक्षक महाराष्ट्र संघाचे अध्यक्ष संतोष खटरमोल, कृष्णा शिंदे, अमित चिबडे, सचिन येवले, प्रशांत मकेसर, सुषमा माने, साक्षी कलमुटकर, रिद्धी देवघरकर, पौर्णिमा काळे आदी उपस्थित होते. योगा प्रशिक्षणाला पहिली ते



सातवी इयत्तेतील मधील २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभागी झाले होते. योगशिक्षक संघाच्या वतीने विद्यार्थ्यांना योगा पासून आरोग्य विषयी असणारी माहिती तसेच योगाचे प्रकार यांची माहिती देण्यात आली. यावेळी योगा बद्दल विविध प्रात्यक्षिका दाखवण्यात आली.

सचिन येवले यांनी विद्यार्थ्यांना हसण्याचे तसेच शरीराला असणाऱ्या फायद्यांची प्रात्याक्षिका करून दाखवली. मुलांमध्ये हस्याचा नवचैत्यन्य झाल.याप्रसंगी केंद्र प्रमुख पारधी शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री आहिरे, ज्ञानेश्वरी वाडीले, मीनाक्षी भगत, संध्या डफळ, सागर डफळ, पांडुरंग घोलप, दिलीप आसवले, सुनील चव्हाण आदी उपस्थित होते.

पान १ वरून

## वावंजे, मानपाडा येथे विकासकामांचे भूमिपूजन



या कार्यक्रमाला जिल्हा सरचिटणीस प्रल्हाद केणी, पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, एकनाथ देशेकर, पंचायत समिती अध्यक्ष प्रकाश खेरे, अल्पसंख्याक रायगड जिल्हा उपाध्यक्ष नासिर शेख, पनवेल तालुका युवा मोर्चा सरचिटणीस सचिन पाटील ,सोशल मीडिया पनवेल तालुका उपाध्यक्ष अंकुश पाटील ,उल्हास पाटील, वावंजे पंचायत समिती युवा मोर्चा अध्यक्ष निलेश दाढावकर ,दशरथ पाटील, प्रकाश मुकादम, अरुण चोरमेकर, भूषण दाढावकर, प्रथमेश म्हात्रे, गुलशन पाटील, मयूर खेरे, चंद्रकांत पाटील, बाळा खैरे, केलास मढवी, फोझन मान्सूरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रासह क्रीडा क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्या -लोकनेते रामशेठ ठाकूर

या वेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख व स्थानिक शाळा समितीचे चेअरमन आणि रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांचेही औचित्यपूर्ण भाषण झाले.

दरम्यान, आय.डी.बी.आय.बँकेकडून विद्यार्थ्यांच्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणासाठी बेनक्यू या कंपनीचा अत्याधुनिक इंटरॅक्टिव्ह बोर्ड विद्यालयास भेट देण्यात आला. आय.डी.बी.आय.बँकेचे प्रादेशिक व्यवस्थापक राजीव कुमार यांचेकडून विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत व प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्याकडे हा इंटरॅक्टिव बोर्ड लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या वेळी आयडीबीआय बँकेचे उलवे शाखा व्यवस्थापक कल्पेश राठोड, प्रादेशिक समन्वयक शशांक कलसान,उलवे शाखेचे रिलेशनशिप मॅनेजर मनमोहन झा, सर्विस ऑपरेटर प्रकाश फालेभट यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

रामशेठ ठाकूर मैदानालगतच भव्य शिवसृष्टी उभारणार असल्याची घोषणा यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केली.तसेच मुंबईच्या शिवाजी पार्कच्या धर्तीवरच रामशेठ ठाकूर मैदानातही सर्व प्रकारच्या खेळांसाठी विशेष अत्याधुनिक सुविधांसह व्यवस्था करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

या सोहळ्यास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंतशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, गव्हाणच्या माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतचे उपसरपंच अमर म्हात्रे, मोरु नारायण म्हात्रे विद्यालय व टी. एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स च्या प्राचार्या प्रणिता गोळे, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, व्ही.के.ठाकूर, वामनशेठ म्हात्रे, भाऊ भोईर, मदन पाटील, वैभव घरत,पी.के ठाकूर, राम मोकल, राजेंद्र देशमुख, रघुनाथ देशमुख, किशोर पाटील, अंकुश ठाकूर, कुंदन मोकल,नामदेवराव ठाकूर,विधिज्ञ रुपेश म्हात्रे, कमलाकर देशमुख, शालिक भोईर, अनुसया घरत, चिंतामण गोंधळी, किरण म्हात्रे, प्रिया शिंदे,गव्हाण विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्यद्वय रविंद्र भोईर व प्रमोद कोळी, गुरुकुल प्रमुख संदिप भोईर व ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे आदींसह पंचक्रोशीतील इतर मान्यवर नागरिक, पालक, विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील,निवड समितीचे सदस्य रविंद्र भोईर, सागर रंधवे, चित्रलेखा पाटील, पारितोषिक वितरण समितीच्या द्रौपदी वर्तक तसेच विद्यार्थ्यांच्या सादरीकरणासाठी तयारी व उपस्थिती विभागाचे उज्वला म्हात्रे, चारुशीला ठाकूर, सारिका ठाकूर व योगिता पाटील,वृषाली म्हात्रे, उर्मिला गोंधळी,प्रमोद करावकर, विशांत ठाकूर,प्रशांत परदेशी, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे व एकनाथ ठाकूर,क्रीडा शिक्षक सुरेश पारवे, रंगमंच व्यवस्था विभागाचे राजू खेडकर,माणिक घरत, कलाशिक्षक गणेश भोईर, छायाचित्रण विभाग प्रमुख उमेश पाटील,रंगोली विभागाच्या अस्मिता पाटील, संपदा म्हात्रे, प्रणाली पाटील, द्रौपदी वर्तक,सर्व वर्गशिक्षक व वर्गशिक्षिका, माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज चे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,स्वयंसेवक आदींनी विशेष परिश्रम घेतले.विद्यालयाच्या सर्व वर्ग शिक्षका व वर्गशिक्षिका तसेच संगणक विभागाच्या सोनाली घरत यांनी नृत्यदिग्दर्शन सहायक म्हणून मौलिक भूमिका बजावली.

बक्षीस वितरण समारंभाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागरकुमार रंधवे व सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील यांनी केले तर संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर यांनी आभार मानले.

## सीरवी विकास सेवा संस्थेचे रक्तदान शिबिर



खारघर : रामप्रहर वृत्त

रायगड पनवेल केमिस्ट और वितरक संघ व सीरवी विकास सेवा संस्थेच्या वतीने खारघर आई माता मंदिर सेक्टर ५ येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात १५६ दात्यांनी रक्तदान केले. संकलन झालेले रक्त टाटा हॉस्पिटल आणि श्री साई ब्लड बँकेला देण्यात आले. या शिबिरात भाजपचे जिल्हा सरचिटणीस ब्रिजेश पटेल, खारघरचा राजा ट्रस्टचे अध्यक्ष विजय पाटील सहभागी झाले होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष हुकमाराम देवडा, सचिव हिरालाल काग यांनी मेहनत घेतली.



**पनवेल : भरले या गावांमध्ये अदानी फाउंडेशन व हेल्पेज इंडिया च्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्याचा १७४ लाभार्थ्यांनी लाभ घेतला त्यामध्ये ७१ पुरुष व १०३ महिलांचा सहभाग होता. आठ मोतीबिंदू पेशंट आढळले त्यांच्यावर २९ जानेवारी रोजी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया नायर हॉस्पिटलद्वारे करण्यात येणार आहे.**

# पनवेलमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

## महानगरपालिकेतर्फे विविध उपक्रम उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत महापालिकेच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या माध्यमातून काव्यवाचन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्न मंजुषा, राज्य गीत प्रसारासाठी फलकाचे अनावरण असे विविध उपक्रम राबविण्यात आले. तसेच महापालिकेच्या वतीने काव्यसंमलेन व काव्य स्पर्धेचे आयोजनही करण्यात येणार आहे.





या बरोबरच पनवेल महानगरपालिकेच्या १० शाळांमधून मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. या पंधरावडा काळात निबंध स्पर्धा, प्रश्न मंजुषा, वक्तृत्व स्पर्धा व शुध्द लेखन स्पर्धा इत्यादीचे आयोजन करण्यात आले. महापालिकेच्या दहाही शाळांमधील विद्यार्थ्यांना मराठी भाषेची समृध्दता कळावी, महत्व कळावे या उद्देशाने घेण्यात आलेल्या या विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

मराठी राजभाषेचा जास्तीत जास्त प्रसार प्रचार व्हावा, मराठी भाषेचे संवर्धन व्हावे यासाठी शासनाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आपल्या राज्यगीताचा जास्तीत जास्त प्रसार व्हावा यादृष्टीने पंनवेल महानगरपालिकेच्यावतीने आज दिनांक २८ जानेवारी रोजी आयुक्तांच्या हस्ते राज्य गीताच्या फलकाचे अनावरण करण्यात आले.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त बाबासाहेब राजळे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, उपअभियंता विलास चव्हाण, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर उपस्थित होते. चार प्रभाग कार्यालये व नाट्यगृह या ठिकाणीही, असे फलक लावण्यात येणार आहेत.

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त बीसीटी विधी महाविद्यालयाचा विशेष सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून सन २०२४-२५ मध्ये केलेल्या मतदार जनजागृतीच्या उल्लेखनीय प्रयत्नांसाठी भागुबाई चांगु ठाकूर विधी महाविद्यालयाचा विशेष सत्कार पनवेलच्या प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांच्याद्वारे करण्यात आला. या निम्मित आयोजित कार्यक्रमात विधी महाविद्यालयाच्या निवडणूक साक्षरता मंडळाचे प्रमुख सहाय्यक प्राध्यापक संग्राम पवार यांनी महाविद्यालयाच्या वतीने सदर सन्मान पत्राचा स्वीकार केला.



पनवेल विधानसभा मतदासंघातर्गत नव-मतदार नोंदणी आणि मतदान जनजागृतीसाठी मोलाचा हातभार लावल्याबद्दल हे विशेष कौतुक करण्यात आले. सहाय्यक प्राध्यापक संग्राम पवार यांच्या प्रयत्नांनी आणि प्राचार्य सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली भागुबाई चांगु ठाकूर विधी महाविद्यालयाच्या अंतर्गत स्थापित निवडणूक साक्षरता मंडळाने २०२४-२०२५ वर्षात केलेल्या कष्टांची ही पोचपावती आहे.

२५ जानेवारी रोजी साजरा केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त सदर कार्यक्रमाचे आयोजन मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय, पनवेल आणि डी डी विसपुते कॉलेज, देवद यांच्या संयुक्त विद्यमाने विसपुते महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. उपविभागीय दंडाधिकारी, पनवेल यांनी मतदारांच्या जबाबदाऱ्या आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवर भाष्य केले. त्यांनी मतदार दिनाच्या निमित्ताने नागरिकांनी अधिकाधिक मतदान करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास पनवेल उपविभागीय अधिकारी पवन चांडक, तहसीलदार विजय पाटील, पनवेल वकील संघटना अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, धनराज विसपुते आदी उपस्थित होते.




**नवी मुंबई : क्रेडाई बीएनएम आणि क्रेडाइ बीएनएम रायगड यांच्या वतीने सीवूड्स येथे २३व्या प्रॉपर्टी प्रदर्शनीचा चार दिवसीय प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या मालमत्ता प्रदर्शनाला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांनी उपस्थित राहून सर्व बांधकाम व्यावसायिकांना शुभेच्छा दिल्या. त्यांनी सर्व नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना राबविण्याचे सांगितले. या वेळी भाजप रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल हेदेखील प्रॉपर्टी एक्स्पोमध्ये उपस्थित होते.**

# दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शुभेच्छा

## माजी सरपंच रमेश पाटील यांच्याकडून विद्यालयासाठी स्वच्छतागृह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते श्री रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील एच एस सी आणि एसएससी विद्यार्थ्यांचा शुभचिंतन समारंभ रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.





या वेळी ह. भ. प. वैकुंठवासी शालुबाई सिताराम पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ माजी सरपंच रमेश पाटील यांनी विद्यालयासाठी तीन लाख २५ हजार रुपये खर्च करून उभारलेल्या स्वच्छतागृहाचेही उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, दुंदरे सरपंच सुभाष भोपी, माजी सरपंच रमेश पाटील, विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटी सदस्य राजेश भोपी, बळीराम भोपी, वंदना भोपी, दीपक पाटील शांताराम चौधरी, विद्यालयाचे मुख्याध्यापक साळुंखे आदी उपस्थित होते.

स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या तसेच मागील वर्षी इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेत पहिले तीन आलेल्या विद्यार्थ्यांचे तसेच नमो चषक २०२५ स्पर्धेत १७ वर्षाखालील वयोगटातील विद्यालयाला चौथा क्रमांक मिळाल्याबद्दल विद्यार्थ्यांचा आणि क्रीडा शिक्षकांचा या वेळी सत्कार करण्यात आला. दरम्यान लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी चंद्रपूर येथे होणाऱ्या खुल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या निखिल भोपी याचा संपूर्ण खर्च करण्याचा आश्वासन निखिलला दिले आहे तसेच विद्यालयासाठी १० स्मार्ट ब्लॅक बोर्ड उपलब्ध करून देणार आहेत.

विद्यालयासाठी स्वच्छतागृह उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम दुंदरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रमेश पाटील यांनी केल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे कौतुकही केले.

# प्रजासत्ताक दिनी साईनगरमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या ७६व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ग्रीन अबोडे सोसायटी साईनगरमध्ये दरवर्षीप्रमाणे या वर्षीही श्री सत्यनारायण महापुजा आयोजित करण्यात आली होती. सभासदांच्या मुलांसाठी व त्यांच्या पालकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी सकाळच्या सत्रात राष्ट्रगीतानंतर मुलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर जोसेफ फायर सेर्व्हिसेस तर्फे जोसेफ फर्नाडीस यांनी इमारतीत आग लागल्यानंतर ती आटोक्यात आणून कशी विझवायची याचे अग्निशामक उपकरणाद्वारे प्रात्यक्षिक तरुण मुले व स्त्रियांकडून करून घेतले.

सायंकाळी महिलांसाठी हळदी कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. तसेच फॅन्सी ड्रेस स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. गायन, नृत्य, वेशभूषा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या भागातील भाजपचे माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे यांनी भेट दिली. या वेळी त्यांचा सत्कार सोसायटीचे अध्यक्ष आल्हाद केंघे व खजिनदार संजय धामणकर यांनी केला. या वेळी श्री. म्हात्रे यांनी काही अडचणी व समस्या असतील तर त्या सोडवण्यासाठी आपण मदत करू असे सांगुन सोसायटीच्या उपक्रमाचे कौतुक केले.

या वेळी सचिव निलम कामठे, कार्यकारिणी सदस्या हर्षा मानकामे, माधवी माने, कार्यकारिणी सदस्य व जेष्ठ लेखक मुक्त पत्रकार दिलीप रेडकर, संजय जगताप, समीर म्हात्रे, तुषार मिठबावकर, मंदार देशपांडे, रणजित चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनश्री कलन्त्रे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोसायटी मधील कार्यकारिणी सदस्य, सभासद यांनी विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमाचा आनंद सर्व सभासदांनी त्यांच्या पाल्यासह घेतला. स्नेह भोजनानंतर स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण होऊन या कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.



**पनवेल : पळस्पे विभागीय युवा मोर्चा अध्यक्ष आणि भिंगार ग्रामपंचायतचे माजी सरपंच योगेश लहाने यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनिश ढवळे आदी उपस्थित होते.**



**उलवे नोड : सेक्टर ८ मधील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली उलवे नोड येथील भाजप पदाधिकाऱ्यांनी बेलापूर येथील रायगड भवनमधील पाणी विभाग अधिकारी ऋषी नाईक यांची भेट घेतली. यामध्ये पाणी प्रश्न लवकरात लवकर सोडविण्याची मागणी करून त्याबाबतचे पत्र त्यांना देण्यात आले. या वेळी नाईक यांनी लवकरच पाणी प्रश्न सोडवू, असे आश्वासन दिले. निवेदन देतेवेळी भाजप विभागीय अध्यक्ष तथा वहाळचे माजी उपसरंपच अमर म्हात्रे, प्रवीण ठाकूर, अवधेश महतो, मयुरेश म्हात्रे आदी उपस्थित होते.**




**पनवेल : जेबीएसपी संस्थेच्या संचालिका तथा वीर वुमन फाऊंडेशनच्या अध्यक्ष अर्चना परेश ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुलोचना कल्याणकर, सोनी कल्याणकर, स्नेहल कल्याणकर, लीना पाटील, कुंदा मेघाडे आदी महिलांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी जेबीएसपी संस्थेच्या सदस्या वर्षा प्रशांत ठाकूर उपस्थित होत्या.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ट्वीन व मिस मॅच दिवस साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २५ ते २९ जानेवारी यादरम्यान सांस्कृतिक विभागातर्फे बिट्स फेस्ट २०२५ चे आयोजन केले आहे. या बिट्स फेस्ट अंतर्गत वेगवेगळ्या दिवसांचे आयोजन केले आहे. त्यामध्ये आज ट्वीन व मिस मॅच दिवस साजरा केला.



महाविद्यालयातील विविध शाखेतील प्रथम द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी वेगवेगळ्या वेशभूषा करून त्यांच्या मित्र व मैत्रिणी सोबत फोटो घेतले तसेच त्यांनी आनंद घेतला. हा दिवस साजरा करण्याचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पारंपारिक वेशभूषा करून महाविद्यालयामध्ये येऊन आनंद घेता यावा हा होता. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वेगवेगळी वेशभूषा करून या ट्वीन व मिस मॅच दिवसाचा आनंद घेण्यासाठी प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या.

या ट्वीन व मिस मॅच दिवसांचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. शुभम शर्मा, प्रा. नीलम मोरे व प्रा. शिवानी मानकामे, प्रा. दिपाली लावंड, प्रा. तनुजा सुमन तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# बीसीटी विधी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचा ७६वा प्रजासत्ताक दिन नवीन पनवेल येथील भागुबाई चांगु ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालय येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे नेतृत्व राष्ट्रीय दिन उत्सव समितीचे प्रभारी प्रा. संग्राम पवार यांनी प्राचार्या सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

राष्ट्रध्वजांनी सुंदर सजवलेल्या विधी महाविद्यालयाच्या फ्लॅग पोस्टवर राष्ट्रध्वज फडकावून सोहळ्याची सुरुवात झाली. सकाळी ८:३० वाजता जेबीएसपी संस्थेच्या सदस्या वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा मान मिळाला. सीडीसी सदस्य अर्चना परेश ठाकूर यादेखील उपस्थित होत्या, त्यांनी कार्यक्रमाचे महत्त्व आणखी वाढवले. यानंतर मेळाव्यात राष्ट्रगीत अभिमानाने गायले गेले, त्यानंतर महाराष्ट्र गीताने ऐक्याची भावना अधिक दृढ केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिशा ढोणे यांनी केले होते, आणि सर्व उपस्थितांवर कायमची छाप पाडून हा कार्यक्रम यशस्वी ठरला.

उत्सव आणि देशभक्तीचे वातावरण निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि शिक्षकेतर अशा दोन्ही शिक्षकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे कार्यक्रमाचे यश मिळाले.



## संपादकीय

# अमेरिकी वर्चस्वाला हादरा

गेले दोन दिवस जगभरात 'डीपसीक' या चिनी स्टार्टअप कंपनीचा प्रचंड बोलबाला आहे. बलाढ्य अमेरिकी तंत्रज्ञान कंपन्या ज्या किमतीला आर्टिफिशिअल इंटेलिजन्स प्रॉडक्ट विकत आहेत, त्या तुलनेत अत्यल्प किमतीत त्याच कार्यक्षमतेची 'एआय' उत्पादने 'डीपसीक'ने जगासमोर ठेवली. त्यामुळे एका दिवसात अमेरिकन 'टेक' कंपन्यांचे बाजारमूल्य प्रचंड घसरले. या घडामोडींनी जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रावरील अमेरिकी वर्चस्वाला हादरा बसला आहे.

**आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ताविषयक तंत्रज्ञान हे मानवी जीवनाच्या भविष्यावर प्रचंड परिणाम करू शकणारे तंत्रज्ञान म्हणून एव्हाना सगळ्यांनाच माहीत झाले आहे. या तंत्रज्ञानामुळे सर्वच क्षेत्रात मानवी बुद्धिमत्ता व मानवी श्रमाऐवजी कृत्रिम बुद्धिमत्तेकडून सारी कामे पार पडतील. ही कृत्रिम बुद्धिमत्ता अतिशय उच्च दर्जाची व वेगाने कामे करणारी असल्यामुळे एकंदरच मानवी जगण्यावर सर्व बाजूंनी परिणाम दिसेल अशी चर्चा सर्वदूर होते आहे. अर्थातच सर्व क्षेत्रांतील मानवी रोजगारांवर, निर्मितीकौशल्यांवर त्याचा नेमका काय परिणाम होईल याचीही चर्चा सुरू आहे. हे आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञान विकसित करण्यात सध्या अमेरिकेतील मायक्रोसॉफ्ट, मेटा, ओपन एआय आदी कंपन्या अग्रेसर असल्याचे चित्र जगासमोर राहिले आहे. भविष्यात 'एआय' तंत्रज्ञानाची मागणी सर्वच देशांतील विभिन्न क्षेत्रांतून येणार असल्यामुळे या बलाढ्य अमेरिकी 'टेक' कंपन्यांमध्ये गुंतवणुकदारांनी अफाट पैसा गुंतवला आहे व या कंपन्याही 'एआय' उत्पादनांच्या निर्मितीत प्रचंड गुंतवणूक करत आहेत. एकीकडे ओपन एआय, मेटा यांसारख्या बलाढ्य अमेरिकी तंत्रज्ञान कंपन्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सची उत्पादने विकसित करण्यासाठी अब्जावधी डॉलर खर्च करत असताना त्या तुलनेत अत्यल्प खर्चात त्यांच्या तोडीस तोड प्रगत असे आर्टिफिशल इंटेलिजन्स विकसित करून 'डीपसीक'ने जगभरातील तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील तज्ज्ञांना प्रभावित व अचंबित केले आहे. 'एआय'साठी लागणाऱ्या आत्यंतिक प्रगत चिप्स 'एनविडिया' ही अमेरिकी कंपनी बनवते. 'एआय'च्या क्षेत्रात चीन स्पर्धेत नको म्हणून एनविडियाच्या या उच्च दर्जाच्या अत्याधुनिक चिप्सची चीनला होणारी निर्यातही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रोखून धरली. एआयच्या विकासासाठी या चिप्स अत्यावश्यक मानल्या जात होत्या. चिप तंत्रज्ञानाची विक्री चीनला करण्यावर अमेरिका बंधने घालत असतानाच 'डीपसीक'च्या ॲपचा उदय झाला. अमेरिकन टेक कंपन्यांच्या तुलनेत अतिशय कमी खर्चात नवे मॉडेल विकसित करून 'डीपसीक'ने जगभरात खळबळ उडवून दिली आहे. 'डीपसीक' हे चिनी आर्टिफिशिअल इंटेलिजन्स ॲप या क्षेत्रातील 'चॅटजीपीटी' व अन्य प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत अमेरिका, युके आणि चीनमध्ये 'ॲपल'च्या ॲपस्टोअरवर आघाडीचे ॲप बनले आहे. 'डीपसीक ॲप'च्या या अफाट लोकप्रियतेमुळेच एआय क्षेत्रातील अमेरिकी टेक कंपन्यांच्या शेअर्सची सोमवारी प्रचंड विक्री झाली. एआयच्या क्षेत्रात काही बलाढ्य अमेरिकी तंत्रज्ञान कंपन्यांचीच मक्तेदारी असल्याचे जे चित्र जगासमोर निर्माण झाले होते, त्या समजालाच आता आव्हान मिळाले आहे. या अमेरिकी कंपन्या भविष्यात जगभरातील एआयच्या बाजारपेठेवर राज्य करतील असे गृहित धरले गेल्यामुळे या कंपन्यांचे शेअर्स गेल्या काही वर्षांत प्रचंड वधारले होते. 'डीपसीक'मुळे हा फुगा फुटला आहे. उच्च दर्जाची कार्यक्षमता असणारे एआय तंत्रज्ञान स्वस्तात उपलब्ध होऊ शकते हे दाखवून देऊन 'डीपसीक'ने बलाढ्य अमेरिकी तंत्रज्ञान कंपन्यांच्या अफाट गुंतवणुकीच्या योजनांबाबतच प्रश्न उपस्थित केले आहेत. जगावर वर्चस्व गाजवण्याच्या ट्रम्प यांच्या वल्गनांनाही या घडामोडींनी धक्का बसला आहे.**


# चौथे सरसंघचालक प्रो. राजेंद्र सिंह उर्फ रज्जू भैया

प्रो. राजेंद्र सिंह (२९ जानेवारी १९२२ - १४ जुलै २००३), ज्यांना रज्जू भैया म्हटले जाते, ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे चौथे सरसंघचालक होते. १९९४ ते २००० दरम्यान ते सरसंघचालक होते. त्यांनी अलाहाबाद विद्यापीठात भौतिकशास्त्र विभागाचे प्राध्यापक आणि प्रमुख म्हणून काम केले, परंतु १९६०च्या मध्यात त्यांनी आपले जीवन आरएसएसला समर्पित केले.

राजेंद्र सिंह यांचा जन्म २९ जानेवारी १९२२ रोजी उत्तर प्रदेशातील शाहजहांपूर शहरात ज्वालादेवी आणि बलबीर सिंग यांच्या घरी झाला, जेव्हा त्यांचे वडील तेथे अभियंता म्हणून तैनात होते. त्यांचे वडील बलबीर सिंग हे मूळचे बुलंदशहर जिल्ह्यातील बनैल पहासू गावचे. रज्जू भैया उन्नावमधून मॅट्रिक झाले. त्यानंतर त्यांनी सेंट जोसेफ कॉलेज, नैनिताल येथे जाण्यापूर्वी थोड्या काळासाठी मॉडर्न स्कूल (नवी दिल्ली) येथे प्रवेश घेतला. अलाहाबाद विद्यापीठात प्रगती करत त्यांनी बी.एस्सी. आणि एम.एस्सी केले.

भौतिकशास्त्रज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते सर सी.व्ही. रमण यांनी रज्जू भैय्याला एक अपवादात्मक हुशार विद्यार्थी म्हणून मान्यता दिली होती, जेव्हा ते एम.एस्सीमध्ये त्यांचे परीक्षक होते. त्यांनी सिंग यांना आण्विक भौतिकशास्त्रातील प्रगत संशोधनासाठी फेलोशिप देऊ केली. स्पेक्ट्रोस्कोपी शिकवण्यासाठी त्यांनी भौतिकशास्त्रात शिक्षण घेतल्यानंतर अलाहाबाद विद्यापीठात प्रवेश घेतला. त्यांनी अनेक वर्षे विद्यापीठात शिकवले, जिथे नंतर त्यांची भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून नियुक्ती झाली. रज्जू भैया यांना अणुभौतिकशास्त्रातील तज्ज्ञ देखील मानले जात होते जे त्या काळात भारतात फारच दुर्मिळ होते. साधेपणा आणि स्पष्ट संकल्पनांचा वापर करणारे ते या विषयाचे अतिशय लोकप्रिय शिक्षक होते.

रज्जू भैया १९४२च्या भारत छोडो आंदोलनात सक्रिय होते आणि याच काळात ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्कात आले. तेव्हापासून त्यांच्या जीवनावर संघाचा प्रभाव पडला. त्यांनी १९६६मध्ये आपल्या विद्यापीठाच्या पदाचा राजीनामा दिला आणि आरएसएसला 'प्रांत प्रचारक' म्हणून पूर्णवेळ सेवा देऊ केली. उत्तर प्रदेशातून सुरुवात करून



त्यांनी १९८०च्या दशकात सर्व कार्यवाह (महासचिव) म्हणून प्रगती केली. १९९४मध्ये त्यांना बाळासाहेब देवरस यांच्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आले.

उत्तर प्रदेशात असताना सिंग रज्जू भैया यांनी लाल बहादूर शास्त्री, चंद्रशेखर आणि व्हीपी सिंग यांच्यासोबत काम केले. मुरली मनोहर जोशी हे त्यांचे उत्तम विद्यार्थी होते. रज्जू भैय्या यांचा सहा वर्षांचा कार्यकाळ संघ आणि भारत या दोघांसाठी अत्यंत महत्त्वाचा होता. रज्जू भैय्या यांनी शैक्षणिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विचारवंतांव्यतिरिक्त वैचारिक ओळी ओलांडणाऱ्या राजकीय नेत्यांशी उत्कृष्ट संबंध सामायिक केला.

फेब्रुवारी २०००मध्ये त्यांची तब्येत बिघडल्यामुळे त्यांनी सरसंघचालक पदाचा त्याग केला आणि केएस सुदर्शन यांना या पदासाठी नामनिर्देशित केले. आणीबाणीच्या काळात ते भूमिगत झाले आणि त्यांनी संपूर्ण भारताचा दौरा केला. सिंग यांनी १९७६मध्ये दिल्ली येथे न्यायमूर्ती व्हीएम तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मानवाधिकार संमेलन आयोजित करण्याची जबाबदारीही सांभाळली होती. इंडिया सोसायटी इंटरनॅशनलच्या मित्रांची स्थापना करण्याचीही त्यांची जबाबदारी होती.

सिंग यांचा एक महत्त्वाचा विश्वास होता की सर्व लोक मुळात छान असतात. प्रत्येक व्यक्तीशी त्याच्या चांगुलपणावर विश्वास ठेवून वागले पाहिजे. राग, मत्सर इत्यादि त्याच्या भूतकाळातील अनुभवांची शाखा आहेत, ज्याचा त्याच्या वर्तनावर परिणाम होतो. प्रामुख्याने प्रत्येक व्यक्ती छान आहे आणि प्रत्येकजण विश्वासार्ह आहे.

रज्जू भैय्या यांचा स्वदेशी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला सशक्त करण्याच्या संकल्पनेवर ठाम विश्वास होता. ग्रामीण विकासाच्या उपक्रमांची सुरुवात करताना त्यांनी १९९५ मध्ये घोषित केले होते की खेडी भूकमुक्त, रोगमुक्त आणि शिक्षणास प्राधान्य देण्यास प्राधान्य दिले पाहिजे. आज १००हून अधिक गावे अशी आहेत जिथे स्वयंसेवकांनी केलेल्या ग्रामविकासाच्या कामामुळे आजूबाजूच्या गावातील लोकांना प्रेरणा मिळाली आहे आणि त्यांच्या प्रयोगांचे अनुकरण ते करत आहेत.

१९९५मध्ये नागपूर येथे विजयादशमी उत्सवाला संबोधित करताना सिंह यांनी मोहनदास के. गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची आठवण केली. या दोन राज्यकर्त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी केंद्रातील सरकारे कोणत्या मार्गाने काम करत होती, असे आव्हान त्यांनी दिले.


रज्जू भैया यांना भारताची राजधानी दिल्लीत बिस्मिल यांच्या नावाचे स्मारक उभारायचे होते. १४ जुलै २००३ रोजी पुण्यातील कौशिक आश्रमात त्यांचे निधन झाले. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे चौथे सर-संघचालक (प्रमुख) होते. विद्यापीठाच्या कॉरिडॉरमध्ये फिरणाऱ्या उत्कृष्ट शिक्षकांपैकी ते एक होते. तथापि, त्यांनी १९६०च्या मध्यात विद्यापीठ सोडले आणि आपले जीवन सामाजिक कार्यासाठी समर्पित केले.

(साभार : इंटरनेट)

# भारतीय पत्रकार आणि राजकारणी जॉर्ज फर्नांडिस

जॉर्ज मॅथ्यू फर्नांडिस हे कामगार नेते, पत्रकार आणि संसदपटू, भारताच्या समाजवादी चळवळीतील महत्वाचे नेते तसेच जनता दल (संयुक्त) पक्षाचे ज्येष्ठ नेते होते. त्यांचा जन्म ३ जून १९३० रोजी मंगलोर येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सोळाव्या वर्षी त्यांना रोमन कॅथॉलिक धर्मगुरू होण्याचे शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यात आले, मात्र जॉर्ज यांनी ते पूर्ण करण्याऐवजी, वयाच्या १९ व्या वर्षी मंगलोरमधील हॉटेल आणि वाहतूक व्यवसायातील कामगारांची संघटना बांधण्याचे काम केले. ही त्यांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात होती. १९४९मध्ये जॉर्ज नोकरीच्या शोधात मुंबईत आले. त्यावेळी सुरुवातीचे त्यांचे दिवस फार खडतर होते, पण त्यांची चिकाटी यावेळी उपयोगी पडली.

त्यांनी सर्वप्रथम १९६७मध्ये दक्षिण मुंबई लोकसभा



मतदारसंघातून काँग्रेसचे पक्षाचे ज्येष्ठ नेते स.का. पाटील यांचा पराभव करून लोकसभेत प्रवेश केला. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील एकमेव रेल्वे कर्मचारी संपाचे त्यांनी १९७४मध्ये नेतृत्व केले. आणीबाणीच्या कालावधीत एक आरोपी म्हणून त्यांनी तुरुंगवासही भोगला. १९७७मध्ये मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत आलेल्या जनता सरकारमध्ये त्यांनी उद्योगमंत्री म्हणून काम पाहिले.

१९९४ मध्ये बिहार राज्याचे मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांच्याशी झालेल्या मतभेदांमुळे त्यांनी आणि जनता दलाच्या नितीश कुमार आणि रवी रे यांच्यासारख्या नेत्यांनी समता पक्ष या स्वतंत्र पक्षाची स्थापना केली. १९९८मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या भाजप आघाडी सरकारमध्ये त्यांनी संरक्षणमंत्री म्हणून काम पाहिले. अशा या झुंजार कामगार नेत्याचे २९ जानेवारी २०१९ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### gmailमध्ये Undoचा वेळ वाढवता येतो का?



अरेरे हे काय झालं, असं म्हणण्याची वेळ अनेकदा आपल्यावर मेल सेंड केल्यानंतर येते. चुकून चुकीचा मेल पाठवण्यात आला. मग Undo करायला गेले की तिकडचीही वेळ निघून गेलेली असते, पण चिंता करू नका. पुढच्या वेळी ही चूक टाळण्यासाठी आजच Gmailच्या सेटिंग्जमध्ये बदल करा. जीमेलमध्ये Undoची वेळ आपण सहज वाढवू शकता. यासाठी ट्रिक जाणून घ्या.

फक्त काही स्टेप्स फॉलो केल्यानंतर तुम्ही जीमेलमध्ये Undo पाठवण्याची वेळ सहज वाढवू शकता. म्हणजे चूक झाली तरी टेन्शन घ्यावं लागणार नाही.

Gmailमध्ये Undoची वेळ कशी वाढवावी?

१. सर्वप्रथम लॅपटॉपवर आपला मेल आयडी लॉगिन करा. २. यानंतर उजव्या कोपऱ्यातील सेटिंग्जमध्ये जाऊन सर्व सेटिंग्ज बघायला जा. ३. तुम्ही Gmail मध्ये Undo ची वेळ ३० सेकंदांपर्यंत वाढवू शकता. ४. सी ऑल सेटिंग्जवर क्लिक करताच तुम्हाला येथे Undo सेंडचा पर्याय दिसेल. ज्यानंतर सेंड कॅन्सलेशन पीरियड लिहिला जाईल. येथे ५. डिफॉल्टने पाठविलेल्या Undoची वेळ ५ सेकंद दिली जाते. ६.५ सेकंदावर क्लिक करताच तुम्हाला येथे ५ ते ३० (५, १०, २० आणि ३०) असे पर्याय दिसतील. ७. तुमच्या इच्छेनुसार वेळ निवडून Undo सेंडची वेळ बदला. अशावेळी जर तुम्ही एखादा Gmail चुकीच्या पद्धतीने पाठवला असेल तर तो पूर्ववत पाठवण्यासाठी तुमच्याकडे भरपूर वेळ असेल.

वर आम्ही तुम्हाला Undo सेंडची वेळ कशी बदलायची याविषयीची माहिती दिली आहे, पण लक्षात घ्या की, कोणतेही ऑफिसचे काम करताना किंवा त्या संदर्भात मेल पाठवताना एकदा व्यवस्थित झाल्याची खात्री करा, त्यानंतर तो पाठवा, कारण अनेकदा यामुळे तुमचे नुकसानदेखील होऊ शकतो. किंवा अर्धवट मेल जाऊ शकतो. त्यामुळे आपण मेल टाईप करतानाच सर्व गोष्टी तपासून त्यानंतर एकदा अंतिम नजर मारून तुम्ही मेल फायनली पाठवू शकतात. तुम्ही लगेच तुमच्या मेलमध्ये वरील माहितीच्या आधारे Undo सेंडची वेळदेखील बदलून लगेच सेफ होऊ शकतात, कारण अशी वेळ कधीही येऊ शकते.

# मेवाडचे सम्राट महाराणा प्रताप



**निमित्त**

महाराणा प्रताप हे उदयपूरमधील मेवाड येथील सिसोदिया घराण्याचे राजा होते. त्यांचा जन्म ९ मे १५४० रोजी राजस्थानच्या कुंभलगड किल्ल्यावर झाला. त्यांची जयंतीदेखील विक्रमी संवत कॅलेंडरनुसार दरवर्षी ज्येष्ठ महिन्यातील शुक्ल पक्ष तृतीयेला साजरी केली जाते, तर मृत्यू २९ जानेवारी १५९७ झाला. त्यांची आज पुण्यतिथी...

महाराणा प्रताप यांचे वडील महाराणा उदय सिंह आणि आईचे नाव जीवत कंवर किंवा जयवंत कंवर होते. ते राणा संगा यांचे नातू होते. त्यांना लहानपणी सर्वजण 'कीका' नावाने हाक मारायचे. राजपुताना राज्यांमध्ये मेवाडचे स्वतःचे विशेष स्थान आहे, ज्यात इतिहासाचे गौरव बाप्पा रावल, खुमान पहिला, महाराणा हमीर, महाराणा कुंभ, महाराणा सांगा, उदय सिंह आणि वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांचा जन्म झाला.

मेवाडच्या राणांचे दैवत एकलिंग महादेव याला मेवाडच्या इतिहासात खूप महत्त्व आहे. उदयपूर येथे एकलिंग महादेवाचे मंदिर आहे. मेवाडचे संस्थापक बाप्पा रावल यांनी हे मंदिर आठव्या शतकात बांधले आणि एकलिंगाची मूर्ती स्थापित केली. प्रताप यांच्या काळात दिल्लीवर मुघल सम्राट अकबराचे राज्य होते, ज्याला भारतातील सर्व राजे आणि सम्राटांना वश करून मुघल साम्राज्याची स्थापना करायची होती आणि संपूर्ण भारतावर इस्लामचा ध्वज फडकवायचा होता. ३० वर्षे सतत प्रयत्न करूनही महाराणा प्रताप यांनी अकबराची अधीनता स्वीकारली नाही. त्यांची समजूत घालण्यासाठी अकबराने चार वेळा शांतीदूत पाठवले होते, परंतु महाराणा प्रताप यांनी अकबराचा प्रत्येक प्रस्ताव धुडकावून लावला.


महाराणा प्रताप यांचा आवडता घोडा 'चेतक' होता. ते ज्या घोड्यावर बसायचे तो घोडा जगातील सर्वोत्तम घोड्यांपैकी एक होता. असे म्हणतात तेव्हा ते ७२ किलोचे चिलखत घालायचे आणि हातात ८१ किलोचा भाला धरायचे. भाले, चिलखत आणि ढाल-तलवार यांचे एकूण वजन २०८ किलो होते. राणा २०८ किलो वजन घेऊन रणांगणात उतरायचे तेव्हा त्यांची शक्ती काय असेल याचा विचार करा.

महाराणा प्रताप यांचा राज्याभिषेक गोगुंडा येथे झाला. युद्ध विभीषिका वेळी राणा उदयसिंगने चित्तोड सोडले आणि अरावली पर्वतावर तळ ठोकला आणि तेथे उदयपूर नावाने एक नवीन शहर वसवले, जी त्यांची राजधानी झाली. भटियानी राणीच्या आसक्तीमुळे उदयसिंगने मृत्यूसमयी आपला धाकटा मुलगा जगमल याच्यांकडे गादी सोपवली होती. प्रताप हे मोठा अपत्य असल्याने नैसर्गिक उत्तराधिकारी होते. उदयसिंगांच्या निर्णयाला त्या वेळी सरदार आणि जहागीरदारांनीही विरोध केला होता.

दुसरीकडे मेवाडची प्रजाही महाराणा प्रताप यांच्याशी संलग्न होती. जगमलला गादी मिळाल्यावर जाहीर निषेध आणि निराशा निर्माण झाली. त्यामुळे राजपूत सरदारांनी मिळून विक्रम संवत १६२८ फाल्गुन शुक्ल १५ म्हणजेच १ मार्च १५७६ रोजी महाराणा प्रताप यांना मेवाडच्या गादीवर बसवले. या घटनेमुळे जगमल त्यांचा शत्रू बनून अकबराशी सामील झाला.

महाराणा प्रताप चावंड येथे १५९७मध्ये युद्ध आणि शिकारदरम्यान झालेल्या जखमांमुळे मरण पावले. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### निरोगी शरीरासाठी योगासने महत्वाची



दिवसातून केवळ अर्धा तास योगासने करून तुम्ही तुमचे शरीर तंदुरुस्त आणि लवचिक ठेवू शकता. यासाठी तुम्हाला जास्त वेळ घालवण्याची गरज नाही. पुढील योगासने केल्यास तुमचा व्यायाम तर होईलच शिवाय ताणतणाव कमी होण्यासदेखील मदत मिळेल.

उत्तानासन

हे आसन सरळ उभे राहून केले जाते. हे करण्यासाठी सरळ उभे राहा.हळूहळू कंबर वाकवून श्वास घेताना आपल्या पायाच्या बोटांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करा. थोडा वेळ या आसनात राहा व परत सामान्य स्थितीत या. आसन करताना गुडघे वाकणार नाहीत याची काळजी घ्या.

सुखासन

या आसनामुळे शारीरिक आणि मानसिक तणाव दूर होतो. जर तुम्हाला तुमचे मन शांत ठेवायचे असेल तर या आसनाचा दररोज सराव करा. हे आसन करण्यासाठी सर्वप्रथम चटईवर मांडी घालून बसा. डोळे बंद करा. मग हातांचे तळवे तुमच्या गुडघ्यावर ठेवा आणि दीर्घ श्वास घ्या. ही प्रक्रिया वारंवार केल्याने श्वासोच्छवास नियंत्रणात राहील.

ताडासन

ताडासन केल्याने शारीरिक आणि मानसिक संतुलन विकसित होते. यासोबतच तुम्हाला तुमचे पोस्चर सुधारायचे असेल तर हे आसन तुमच्यासाठी खूप फायदेशीर आहे. हे आसन संधिवाताच्या रुग्णांसाठी खूप चांगले मानले जाते. हे आसन करण्यासाठी सरळ उभे राहा. यानंतर पाय जवळ घ्या व हात पूर्णपणे वर करून दीर्घ श्वास घ्या. डोळे बंद ठेवा. काही काळ या स्थितीत राहिल्यानंतर, हळूहळू श्वास सोडा आणि पुन्हा पूर्वीच्या स्थितीत या..

शवासन

निरोगी जीवनशैलीसाठी शवासन खूप फायदेशीर आहे. हे आसन करण्यासाठी सर्वप्रथम चटईवर झोपा व पाय आणि हात सरळ ठेवा.पायांमध्ये थोडे अंतर ठेवा. शरीर सैल सोडा आणि लक्ष श्वासावर केंद्रित करा. किमान १० मिनिटे या स्थितीत रहा. आता हळूहळू श्वास सोडा आणि सामान्य स्थितीत या.

# महाड एमआयडीसीकडून अनधिकृत टपऱ्या व बांधकामावर कारवाई

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक क्षेत्र परिसरातील बेकायदेशीर व्यावसायिक टपऱ्या व बांधकामांवर कारवाई करण्याची मोहीम औद्योगिक महामंडळ प्रशासनाने हाती घेतली असून सोमवारी २७ जानेवारी रोजी अनधिकृत टपऱ्या तसेच बांधकाम जेसीबी व बुलडोझर द्वारे उध्वस्त करण्यात आले. ही मोहीम न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.



महाड औद्योगिक क्षेत्रामध्ये सध्या कारखाने कमी व टपऱ्या जास्त अशी परिस्थिती दिसून येत होती. त्यातच काही टपऱ्या व्यवसायीकांनी पक्की बांधकामे देखील केली होती. राज्यातील सर्वच औद्योगिक क्षेत्रामध्ये अनधिकृतरित्या उभ्या असणाऱ्या टपऱ्या हटवण्याबाबत न्यायालयाने यापूर्वीच आदेश दिलेले होते परंतु महाड एमआयडीसीमध्ये मात्र ही कारवाई थांबली होती.

सोमवारी एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता उमेश देशमुख, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या उपस्थितीमध्ये टपऱ्या हटविण्याची मोहीम सुरू करण्यात आली. ही कारवाई एमआयडीसी प्रवेशद्वार नांगलवाडी फाटा ते आमशेत गावाच्या हद्दी पर्यंत करण्यात आली. या वेळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आता ही कारवाई झाल्याने एमआयडीसीने देखील मोकळा श्वास घेतला आहे.

या कारवाईच्या वेळी अनेक वर्षांपासून या ठिकाणी व्यवसाय करत असलेल्या कुटुंबांनी विरोध करत आपल्या व्यथा मांडत आम्ही याच व्यवसायावर अवलंबून असून आम्ही स्थानिक भूमिपुत्र तसेच प्रकल्प बाधित आहोत त्यामुळे आम्हाला व्यवसाय करण्यासाठी एमआयडीसी सहकार्य करावे आम्ही देखील सहकार्य करू आणि याबाबत एमआयडीसीने नियमावली घालून दिल्यास त्याप्रमाणे आम्ही व्यवसाय करू परंतु आमच्या टपऱ्या उध्वस्त करू नये अशी भूमिका येथील व्यवसायिकांनी घेतली होती

परंतु अनेक परगावातील व परप्रांतीय व्यवसायिकांनी येथे बस्तान बसविल्याने टपऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली होती. सध्या महाड औद्योगिक क्षेत्रामधील मुख्य रस्त्याचे रुंदीकरणही केले जात असल्याने ही कारवाई केली गेल्याचे सांगण्यात आले. या कारवाईमुळे येणाऱ्या काळामध्ये एमआयडीसी आणि स्थानिक व्यावसायिकांमधील संघर्ष मात्र वाढण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

# वडखळ अंगणवाडीच्या पोषण आहारात सापडला मेलेला उंदीर

**पेण : प्रतिनिधी**

बालकांचे आरोग्य सुदृढ राहावे यासाठी कोट्यवधी रुपये खर्चून शासनाने त्यांना शालेय पोषण आहार देण्याची सुरुवात केली. मात्र, या आहारातून मुलांचे पोषण नाही, तर त्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पेण तालुक्यातील वडखळ अंगणवाडीत मुलांच्या पोषण आहाराच्या पाकिटामध्ये चक्क मेलेला उंदीर आढळला आहे. या प्रकारामुळे प्रशासनाचा अनागोंदी कारभार पुन्हा चव्हाट्यावर आला आहे



पेण तालुक्यातील वडखळ अंगणवाडीमध्ये महाराष्ट्र शासनाकडून सहा महिने ते तीन वर्षांच्या बालकांसाठी येणाऱ्या खाऊचे वाटप सुरु असताना एका पिशवीमध्ये अंगणवाडी सेविकांना संशयास्पद कडक वस्तू असल्याचे आढळून आले. त्यावेळी त्यांनी ते पाकीट फोडले असता त्यामध्ये कुजलेला उंदीर आढळून आला. अंगणवाडी सेविकेने सरपंच व सदस्यांना बोलावून झालेला प्रकार सांगितला.

मल्टी मिक्स सिरीयल्स अँड प्रोटिन्स या पाकीटमध्ये मोठा उंदीर होता. गटविकास अधिकारी सोनल सूर्यवंशी यांनी सहाय्यक गटविकास अधिकारी व , विस्तार अधिकारी यांना घेऊन अंगणवाडीला भेट देउने पंचनामा करण्यास सांगितले.

अन्नपदार्थ पुरवणारा ठेकेदार राजस्थानचा आहे. त्याला महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांशी काहीही घेणे-देणे नाही. यामध्ये अंगणवाडी सेविकांचा दोष नाही, मात्र ठेकेदाराने चांगल्या प्रतीचे अन्न पुरविणे गरजेचे आहे असे यावेळी सरपंच योगेश पाटील यांनी सांगितले.

**वडखळ येथील झालेल्या प्रकाराबाबत तातडीने बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांना पंचनामा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत**

**-डॉ. भरत बास्टेवाड, राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी**

# जोसरांजन येथे खासदार निधीमधून बापुजीदेव मंदिर येथील सभामंडप बांधण्याचा भूमिपूजन समारंभ

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यामधील खार आंबोली ग्रामपंचायत अंतर्गत जोसरांजन येथे रायगड रत्नागिरी लोकसभा क्षेत्राचे खासदार सुनील तटकरे यांच्या खासदार निधीमधून २५ लाख रुपये खर्च करून बापूजीदेव मंदिर येथील सभामंडप बांधण्याचा भूमिपूजन समारंभ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे रायगड जिल्हा सोशल मिडियाचे उपाध्यक्ष हसमुख भूर्मल जैन यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला.

यावेळी त्यांच्यासमवेत मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष फैरोज घलटे,सचिव विजय पैर,मुरुड तालुका महिला अध्यक्ष ॲड.मृणाल खोत,माजी सभापती आशिका ठाकूर,स्मिता खेडेकर,माजी नगरसेविका प्रिता चौलकर,माजी सरपंच अजित कासार,माजी जिल्हा परिषद सदस्य नम्रता कासार,शहर अध्यक्ष संजय गुंजाळ,माजी सरपंच योगेन गोयजी ,विकास दिवेकर,आगरदांडा सरपंच आशिष हेदुलकर,समाज अध्यक्ष चंद्रकांत गायकर,उपाध्यक्ष संजय ठाकूर, आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित लोकांना मार्गदर्शन करताना हसमुख जैन यांनी सांगितले की,सदरील कामासाठी माजी सभापती अशिका ठाकूर यांचा पाठपुरावा होता.खासदार तटकरे साहेब यांनी या विशेष कामासाठी २५ लाख रुपये देऊन जर निधी कमी पडला तर आणखीन निधी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले.त्यामुळे ग्रामस्थ मंडळी यांनी या कामाबाबत कोणतीही चिंता करू नये असे आवाहन केले.



# महाड पोलिसांनी सोनसाखळी चोराला केले अटक

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरात वृध्द महिलेला फसवून दागिने लंपास करण्याची घटना जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घडली होती. या प्रकरणातील आरोपी खादीम हुसेन सय्यद उर्फ इराणीला या सराईत गुन्हेगाराला कल्याण मधून अटक करण्यात आली आहे.

महाड शहरात सहा जानेवारी रोजी कुंभार आळी परिसरात एका वृद्ध महिलेला फसवून सोन्याची चैन व सोन्याची बोरमाळ घेऊन चोरटे फरार झाले होते. महाड शहर पोलिसांना या चोरांची माहिती मिळाल्यानंतर त्याला आंबिवली तालुका कल्याण येथून अटक करण्यात आली आहे. माणगाव प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्याकडे हजर केले असता ३० जानेवारीपर्यंत कस्टडी मिळाली आहे.

यातील अन्य आरोपींचा लवकरच छडा लावला जाईल असे पोलिसांनी सांगितले आहे. या तपास पथकामध्ये पोलीस उपनिरीक्षक संदीप पाटील, पोलीस अंमलदार विकास सुतार, प्रतीक कदम यांचा समावेश होता. याबाबत अधिक तपास महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील करत आहेत.


**E.H.V. Civil Const. cum Maint. Division, Panvel**

**SRM e-Tender Notice No. 09/2024-25**

MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| SRM e-Tender No. | RFx no. | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 44/2024-25 | 7000034995 | Providing borewell at Major Store Panvel.(IIIrd Call) | 417353.00 |
| 45/2024-25 | 7000034996 | Upkeeping by general cleaning, sweeping of premises of building at staff quarters colony Wasambe for FY 2024-25. (IIIrd Call) | 125112.00 |
| 46/2024-25 | 7000034997 | Upkeeping general cleaning sweeping at civil S/Dn office Kharghar. (IIIrd Call) | 62556.00 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: www.mahatransco.in. Contact person: Dy. Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022)27480325/ Mob no. 9765644291

**Sd/-**
**Executive Engineer (Civil), Panvel.**


# गीतांतून उलगडला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट



**अलिबाग : प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त अलिबाग येथे 'संगम भक्ती शक्तीचा' या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात गीतांमधून अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट उलगडून दाखवण्यात आला. गाज फाऊंडेशन आणि सावी फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने तसेच संस्कार भारती यांच्या सहयोगाने हा उपक्रम राबवण्यात आला.

अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन कार्य लोकापर्यंत पोहोचावे हा या कार्यक्रमागचा प्रमुख उददेश होता. त्यांच्या कार्याचा जागर करत, त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेणाऱ्या भावी पिढ्यांना मार्गदर्शन करणे तसेच यानिमित्ताने ऐतिहासिक व सामाजिक विषयांवर चर्चा घडवून, परंपरा आणि आधुनिकतेचा संगम साधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या वेळी सहकार भारतीचे डॉ. उदय जोशी, रघुजीराजे आंग्रे, ॲड. जयंत चेऊलकर , डॉ विशाखा मोडक, प्रदीप नाईक, ॲड. प्रसाद पाटील, ॲड. मानसी म्हात्रे , अनिल चोपडा आणि अलिबागकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांनी अहिल्यादेवींच्या समाजसुधारकांवर प्रकाश टाकत त्यांचे विचार आजही समाजासाठी मार्गदर्शक असल्याचे सांगितले. या उपक्रमामुळे अहिल्यादेवींच्या विचारांचे संवर्धन होईल व त्यांच्या कार्याचे महत्व पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचेल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली.

# सैनिकाचा सेवापूर्ती सोहळा

**पेण : रामप्रहर वृत्त**

भारतीय सैन्य दलात विविध संकटांना सामोरे जात आपल्या प्राणाची बाजी लावून देशाचे रक्षण करणारे जवान भारतमातेचे भूषण असतात. अशा सैनिकांचा त्यांच्या गावांना मोठा अभिमान असतो. पेण आमटेम गावचे भूमी पुत्र युवराज नारायण तांबोळी हे भारतीय सैन्य दलातून रेजिमेंट हवालदार मेजर या पदावरून भारत मातेची २४ वर्ष अविरत सेवा करून निवृत्त होत आहे. त्या निमित्त ग्रामस्थांनी मिरवणूक सोहळा दत्त मंदिर आमटेम, येथे २ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता सेवापूर्ती सोहळा आयोजित केला आहे.



## जाहीर नोटीस

या नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे आशीलाचे सांगणेनुसार मौजेः नेवाळी, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, येथील सर्व्हे नं. २६/३ व सर्व्हे नं. ४३/५/७, क्षेत्रफळ सुमारे ००.२७.१० (हे.आर.पॉ) व ००.१६.४० (हे.आर.पॉ) प्रत्येकी चे संपादनाचे प्रित्यर्थ मिळणारा अंतिम भूखंड क्र. ८२९, क्षेत्रफळ सुमारे १७४० चौ. मी. मौजेः नेवाळी, तालुका पनवेल, जिल्हा रायगड (येथुन पुढे '' **सदरहु मिळकत** '' असे संबोधण्यात येईल) ही नारायण बाळू पाटील यांचे मालकीहक्कात व ताबेकब्जात आहे.

आमचे आशीलांनी सदरहु मिळकत मालकांकडून रितसर नोंदणीकृत दस्तान्वये विकसनाकरीता घेणेचे योजिले आहे.

सदरहू वर नमूद मिळकतीबाबत कोणाचाही दान, बक्षीस, गहाण, भाडेपटटा, विकसन, करारनामा, वारसाहक्क फरोक्त, कुळवहीवाट, साठेकरार, सामंजस्य करार, लिज पेडन्सी, कोर्ट ऑर्डर, ताबा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ (एकविस) दिवसाचे आत खाली सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वर नमूद मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहु सदनिका निर्वेध, निर्दोष व बोजरहीत असल्याचे गृहीत धरून आमचे आशील सदरहु मिळकतीचा विकसनाबाबतचा व्यवहार पूर्ण करतील व सदरहू मालक याचेसमवेत रितसर नोंदणीकृत विकसनाच्या दस्तान्वये सदरहु मिळकतीचे विकसनाबाबतचे हितसबंध व ताबेकब्जा सदरहू मालक यांचेकडून करून प्राप्त करतील. मुदतीनंतर मागाहून येणाऱ्या हरक्तीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दि.२८/०१/२०२५**

**सही/-**
**ॲड. अभिषेक विजय भिडे**
**हायकोर्ट वकील**
**पत्ता : शॉप नं. २४, निलकंठ दर्शन को. ऑप हाऊसिंग सोसायटी, नाडकर्णी हॉस्पिटल जवळ, पनवेल ४१०२०६**

## जाहीर सुचना

तमाम जनतेला कळवीण्यात येते की, माझे अशील श्रीमती नजरिना बेगम मुजीब कुरेशी, रा. बोर्ला गोवंडी, वैभव नगर, अमरनाथ स्कूल, आर-१, गोवंडी, मुंबई ४०००८८, यांच्या मालकिचा 'फ्लॅट क्रमांक ३०४, तिसरा मजला, ऑरा रोझ सोसायटी, प्लॉट क्रमांक ९६, सेक्टर-१४, तळोजा पाचनंद, तालुका पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६' ही सदनिका आहे ('सदरहु सदनिका'). सदरहु सदनिके संदर्भात श्रीमती अंजू मनीष गंगर आणि श्री. चेतन रामकृष्ण म्हात्रे यांच्यातील सदर फ्लॅट क्रमांक ३०४ बाबतचा मूळ विक्री करार जो दिनांक ३०/०९/२०११ रोजी सब-रजिस्ट्रार ऑफ अॅश्युरन्स पनवेल-३ च्या कार्यालयात नोंदणी क्रमांक पनवेल/३/०९७४२/२०११ अंतर्गत रीतसर नोंदणीकृत आहे. तसेच त्याची मूळ सुची क. २ आणि नोंदणी पावती, ही कागदपत्रे माझे अशीलांकडून हरवली आहेत. त्याबाबत माझे अशीलांनी तळोजा पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे दिनांक २७/०१/२०२५ रोजी गहाळ वस्तु रजिस्टर क. ७०/२०२५ अन्वये तकार नोंदवीली आहे.

सदर गहाळ झालेल्या कागदपत्रांच्या व सदरहु सदनिकेच्या अनुशंगाने कोणास काही माहीती असल्यास अथवा कोणाचीही हरकत, दावा, तक्रार, तारण, गहाण, दान, बोजा, पोटगी वा अन्य कोणताही हक्क - हितसंबंध असल्यास, त्या व्यक्तीनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार वकील यांजकडे लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास व मागाहून येणा-या हरकती हया जाणीवपुर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन, सदरहु सदनिका पुर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरुन तशा निर्वेधतेचा दाखला खाली सही करणार वकील देतील याची नोंद घ्यावी.

**नवी मुंबई**
**दि.२८/०१/२०२५**

**सही/-**
**ॲड. ज्ञानेश्वर मो. बऱ्हाटे**
**ऑफीस क. ४८, जय गणेश सो.,**
**कृष्णा अपार्टमेंट, प्लॉट नं. ३४, सेक्टर ३६,**
**कामोठे, नवी मुंबई-४१०२०९**
**मो.क्र. ८०८२०२०३१५**

# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

## // जाहीर सूचना //

**विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये पनवेल** महानगरपालिकेच्या **सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजना प्रसिध्दीवर प्राप्त** सूचना/हरकतीच्या **अनुषंगाने सुनावणी बाबत.**

**पनवेल** महानगरपालिकेची **सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ रोजी महाराष्ट्र शासन** असाधारण **राजपत्र क्र. ७२ नुसार प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर प्रारूप विकास योजना प्रसिद्धीच्या अनुषंगाने ३० दिवसांच्या विहित मुदतीत सुचना व हरकती मागविल्या होत्या. सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजनेवर विहीत मुदतीत पनवेल** महानगरपालिकेकडे **प्राप्त** सूचना/हरकतीच्या अ**नुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (२) अन्वये सुनावणी घेण्यासाठी नियोजन समिती गठीत करण्यात आलेली आहे.**

**सदर नियोजन समितीमार्फत दि. ०६/०१/२०२५ पासून आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, तिसरा मजला, आर्ट गॅलेरी, पनवेल ४१०२०६ या** ठिकाणी सुनावणी घेण्यात येत आहेत. **उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे विहित मुदतीत ज्यांनी पनवेल** महानगरपालिकेकडे **सुचना / हरकती नोंदविल्या आहेत परंतु ज्यांना सुनावणीचे पत्र प्राप्त झाले नाही त्यांनी नियोजन समिती समोर आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. २९/०१/२०२५ रोजी दुपारी २:०० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत** खालील नमुद पत्यावर सूचना / हरकतींचे पत्र व इतर आवश्यक कागदपत्रांसह कृपया उपस्थित रहावे. तसेच, सुनावणी करिता आपल्या तर्फे प्रतिनिधी हजर राहणार असल्यास सदर प्रतिनिधीस आवश्यक ते प्राधिकारपत्र देण्यात यावे.

सदर सुनावणीस आपण अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहीले नाही तरी आपल्या संदर्भिय लिखीत अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने आपल्या अनुपस्थितीत नियमानुसार उचित निर्णय घेण्यात येईल.

**सही/-**
**(मंगेश चितळे)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**पनवेल महानगरपालिका**

पत्ता :- आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, तिसरा मजला, आर्ट गॅलेरी, पनवेल- ४१०२०६

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.३७/३७/२०२५
दिनांक :- २४/०१/२०२५

## निवडक



## ‘याकूब बेग’मध्ये प्रजासत्ताक दिन

**पनवेल :** पनवेल एज्युकेशन सोसायटी संचालित याकूब बेग हायस्कूल व ज्युनियर कॉलेज पनवेल येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण सोसायटीचे अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योजक इकबाल हुसेन काझी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष माजी नगरसेवक मुकित काझी, सचिव अलीम पटेल, अँग्लो उर्दू हायस्कूल बारापाडाचे चेअरमन नवीद पटेल सदस्य जुबेर पित्तू शाळेचे, प्राचार्य आसिम पटेल तीनही शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक, विद्यार्थी व अनेक मान्यवर उपस्थित होते.

## जेएनपीएमध्ये प्रजासत्ताक दिन



**उरण :** जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरण येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा केला गेला. या कार्यक्रमाला जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष आणि वाढवण बंदर प्रकल्प लिमिटेडचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक उन्मेष शरद वाघ हे प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. १८ डिसेंबर २०२४ रोजी बोटीवरील प्रवाशांचे प्राण वाचवणाऱ्या जनेप प्राधिकरण आणि सीआयएसएफच्या नऊ कर्मचाऱ्यांचा, त्यांचे शौर्य आणि निःस्वार्थता अधोरेखित करून सत्कार करण्यात आला.

## उरण नगर परिषदेत प्रजासत्ताक दिन

**उरण :** नगर परिषद वतीने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. प्रशासक समीर जाधव यांच्या हस्ते उरण नगर परिषद कार्यालया समोर ध्वजारोहण करण्यात आले. भवरा समाज मंदिर समोर कर निरीक्षक संजय डापसे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. प्राथमिक शाळा क्र .१,२ चे पटांगण येथे नगर अभियंता निखील ढोरे यांच्या हस्ते झाले. मोरा येथे लेखापाल सुरेश हिरू पोसतांडेल यांच्या हस्ते झाले. समाज मंदिर समोर प्रशासकीय अधिकारी अनिल जागधनी यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, माजी नगरसेवक राजू ठाकूर, धनंजय कडवे, संतोष, संजय पवार, विजय पवार, हर्षद कांबळे, विशाल गायकवाड आदी उपस्थित होते.

# ‘सीकेटी’मध्ये प्राध्यापक विकासाला प्राधान्य

## राष्ट्रीयस्तरावरील कार्यक्रम उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज व डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने PMAUSHA स्कीम फॉर स्ट्रेंथन युनिव्हर्सिटीज (GSU) अंतर्गत दिनांक २० जानेवारी ते २५ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीयस्तरावरील प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमांतर्गत सहयोगी शैक्षणिकांसाठी सामग्री निर्मिती, क्युरेशन आणि संकलन या विषयी माहिती देण्यात आली. या वेळी प्रमुख अतिथी कुलगुरू, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबईचे, प्रो. डॉ. रजनीश के. कामत, व्हिक्टोरियल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ऑस्ट्रेलियाचे उपाध्यक्ष, मा. प्रो. डॉ. अरुण पाटील, चांगु काना ठाकूर कॉलेजचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, कलाशाखेचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील, विज्ञानशाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, रुसा समन्वयक डॉ. एस. एन.वाजेकर, विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई, जैवरसायन विभागाच्या प्रा. डॉ. उत्कर्षा लेखक, रसायनशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. शुभांगी पाटील व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. समाधान वाघमोडे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.

पहिल्या दिवशी मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन सोहळा झाला. त्या वेळी प्रो. डॉ. अरुण पाटील यांनी NEP २०२० व ब्लूमचे वर्गीकरण या विषयावर विशेष भर दिला. तसेच प्रो. डॉ. रजनीश के. कामत यांनी एआयचे महत्त्व आणि त्यासाठी डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई यांच्या कडून राबविले जाणारे प्रोजेक्ट याचा आढावा दिला. विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे यांनी प्रमुख अतिथी कुलगुरू, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबईचे,. प्रो. डॉ. रजनीश के. कामत, व्हिक्टोरियल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ऑस्ट्रेलियाचे उपाध्यक्ष,मा. प्रो. डॉ. अरुण पाटील यांचा परिचय उपस्थितांना करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रा. डॉ. अनुप्रिता वाठारकर यांनी केले. तसेच रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक व रुसा समन्वयक डॉ. एस. एन.वाजेकर यांनी कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन केले

प्रथम सत्रात प्रो. डॉ. अरुण पाटील यांनी उपस्थित प्राध्यापकांना चजजउड बद्दल परिचय करून दिला. दितीय सत्रात विकॅन डिजिटल सोल्यूशन (एडटेक कंपनी) पुणेचे, संस्थापक आणि संचालक, डॉ. गणेश लोखंडे यांनी MOOC विकास चक्र आणि MOOC व्हिडिओंसाठी स्क्रिप्ट लेखन या विषयावर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशी प्रथम सत्रात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे, डॉ. सुहास पाचपांडे यांनी चजजऊी आणि इतर ई-सामग्रीच्या लर्नर केंद्रित डिझाइनवर माहितीपूर्ण व्याख्यान दिले. दितीय सत्रात सिमबायोसीस, पुणेचे डॉ. सप्तर्षी घोष यांनी शैक्षणिक उद्यमशीलता या विषयावर मार्गदर्शन केले.

तिसऱ्या दिवशी प्रथम सत्रात सिमबायोसीस स्कूल ऑफ इकॉनोमिक्स, पुणेचे प्रा. के.के. रॉय यांनी LCM² मॉडेलचे विहंगावलोकन आणि परस्परसंवादी व्हिडिओ बनवणे या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान दिले. दितीय सत्रात प्रा. के.के. रॉय यांनी कार्यक्षमता वाढवण्यासाठी AI पॉवर टूल्स या विषयावर मार्गदर्शन केले तसेच डीएव्ही वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर, इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. दीपक ननावरे यांनी तंत्रज्ञानाद्वारे नेतृत्व करण्यासाठी शिकण्याची उद्दिष्टे आणि परिणाम शोधणे या विषयावर मार्गदर्शन केले.

चौथ्या दिवशी प्रथम सत्रात डीएव्ही वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर, इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ.दीपक ननावरे यांनी टेक-असिस्टेड अध्यापन योजना आणि रुब्रिक्स डिझाइन करणे या विषयावर मार्गदर्शन केले तसेच ग्रीन वायटल्स, पुणे चे संस्थापक डॉ. महेंद्र रांजेकर यांनी बेंच ते बोर्डरूम: संशोधन ते कमाईचा मार्ग नेव्हिगेट करणे या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान दिले. दितीय सत्रात चांगू काना ठाकूर कॉलेजचे ग्रंथपाल, डॉ. रमाकांत नवघरे यांनी व्हिडिओ व्याख्याने रेकॉर्डिंग, संपादन आणि तयार करणे या विषयावर मार्गदर्शन केले.

पाचव्या दिवशी प्रथम सत्रात डॉ. रमाकांत नवघरे यांनी मागील दिवसीय विषयाला अनुसरून मार्गदर्शन केले. दितीय सत्रात ग्रॅवीटीनो बायो इंजिनिरिंग मुंबई आणि अविद डायगनोस्टिकस् मुंबईचे, सह संस्थापक डॉ. मोहन भागवत यांनी तांत्रिक आणि गैर-तांत्रिक शिक्षणामधील अंतर कसे कमी करावे या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान दिले.

सहाव्या दिवशी प्रथम सत्रात निवो एड लर्निंग सोल्युशन्स मुंबईच्या नेहा सिन्हा यांनी कंटेंट मास्टरी आणि स्व-विकासाद्वारे एजुप्रेन्युअर बनणे या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच दितीय सत्रात डक्षलेगीस, मुंबई चे मा. दिव्येंदू वर्मा यांनी ही सामग्री कोणाची आहे? सामग्री सर्जनशीलतेच्या युगात कॉपीराइटवर मार्गक्रमण करणे या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान दिले.

निरोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डक्षलेगीस, मुंबईचे मा.दिव्येंदू वर्मा, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई, इनक्युबेशन, इनोव्हेशन आणि लिंकेज चे नोडल ऑफिसर प्रो. (डॉ.) विशाल बनेवार लाभले होते. डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई, जैवरसायन विभागाच्या प्रा. डॉ. उत्कर्षा लेखक यांनी प्राध्यापक विकास कार्यक्रमाचा आढावा घेतला. तसेच सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. समाधान वाघमोडे यांनी कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमाचा एकूण ११६ प्राध्यापकांनी लाभ घेतला. ब्रॅडफोर्ड विद्यापीठ लंडन येथील डॉ. शरद कांबळे यांनीदेखील आपले मनोगत व्यक्त केले.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे, रुसा समन्वयक डॉ. एस. एन.वाजेकर व विज्ञान संघटनेचे सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पारंपारिक दिवस

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २५ ते २९ जानेवारी यादरम्यान सांस्कृतिक विभागातर्फे बिट्स फेस्ट २०२५ चे आयोजन केले आहे. या बिट्स फेस्ट अंतर्गत वेगवेगळ्या दिवसांचे आयोजन केले आहे त्यामध्ये पारंपारिक दिवस साजरा केला.

महाविद्यालयातील विविध शाखेतील प्रथम द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आज पारंपारिक वेशभूषा करून त्यांच्या मित्र व मैत्रिणीसोबत फोटो घेतले तसेच त्यांनी आनंद घेतला. हा दिवस साजरा करण्याचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पारंपारिक वेशभूषा करून महाविद्यालयामध्ये येऊन आनंद घेता यावा हा होता. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना



वेगवेगळी वेशभूषा करून या पारंपारिक दिवसाचा आनंद घेण्यासाठी प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या.

या पारंपारिक दिवसाचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. शुभम शर्मा, प्रा. नीलम मोरे व प्रा. शिवानी मानकामे, प्रा. दिपाली लावंड, प्रा. तनुजा सुमन तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## लिटिल ईगल स्कूलचे स्नेहसंमेलन

### माजी नगरसेविका दर्शना भोईर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिरढोण येथील समिरा फाऊंडेशनच्या लिटिल ईगल प्री प्रायमरी स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांची उपस्थिती लाभली. त्यांचे शाळेकडून स्वागत करण्यात आले.




यासोबतच पळस्पे येथील एमएनआर इंटरनॅशनल स्कूलच्या ॲडमिन हेड भाग्यश्री कादंबरी, जेएनपीटी सेंट मेरी स्कूलच्या व्हाईस प्रिन्सिपल संदेश गावंडे, पेण नगरपालिका स्कूलच्या माजी मुख्याध्यापिका उज्ज्वला निकम, अरूणा पाटील, आशा तळोजकर, सोनल महाडीक, भावेश माळी, शिक्षका मिनाक्षी मेस्त्री, रेणु मलेसिया, जनार्दन पाटील, सुरेश कुंभार आदींसह पालक, विद्यार्थी उपस्थित होते.



**खारघर :** येथील इस्कॉन मंदिरामध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पत्नी शकुंतला ठाकूर यांच्या समवेत भेट देत दर्शन घेतले. या वेळी नातू अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर उपस्थित होते.



**उलवे नोड :** सेक्टर २० येथे भगवान बाबा, नारायण महाराज, वामन भाऊ पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी आयोजकांनी त्यांचे स्वागत केले.



**पनवेल :** करंजाडे येथील एमएनआर गोल्डन किड्स शाळेमध्ये प्रजासत्ताक दिवस आणि शाळेचा पहिला वर्धापन दिवस साजरा करण्यात आला. या वेळी करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार यांच्या सह अन्य मान्यवरांची उपस्थिती लाभली.

# समाजसेवक डॉ. अरुणकुमार भगत

**जे का रंजले गांजले ।**
**त्यांसी म्हणे जो आपुले ।।**
**तोचि साधू ओळखावा ।**
**देव तेथेचि जाणावा ।।**

असं संत तुकाराम महाराजांनी एका अभंगात म्हणतात त्यातील ही ओवी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांना लागू पडते. सकाळी उठल्यापासून ते रात्री उशिरा झोपेपर्यंत सामाजिक प्रश्नावर स्वतःला झोकून दिलेले मी पाहिले आहेत. २००१ला मुंबईहून कामोठ्यात आल्यावर डॉ. भगत आणि माझी भेट झाली ती त्यांच्या पत्नी वकिल आशाताई भगत यांच्यामुळे त्या राजकिय पक्षात सक्रिय होत्या.

कामोठे ग्रामपंचायत निवडणूकीत प्रचारदरम्यान डॉक्टरांची व माझी भेट झाली. शांत स्वभाव, थोरांचा आदर, मोजके बोलणे पण तेही हसत मुखाने समजदार स्वभाव, दुसऱ्याचे बोलणे ऐकूण घेण्याची प्रवृती, साधी सरळ रहाणी बोली हे गुण मला डॉ साहेबाचे खुप आवडले. परोपकारी डॉक्टर म्हणून काही लोकांकडून ऐकले होते. ज्यांच्या कडे पैसे नसतील त्यांना मोफत उपचार केले जातील असा दवाखान्यात बोर्ड लावलेला डॉक्टर मी पहिल्यांदा पाहिला. एक लोकप्रिय डॉक्टर म्हणून त्यांनी लोकप्रियता कमविली आणि तिथूनच लोकप्रियतेचे बाळ कडु मिळाले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली काम करित असताना पनवेल महानगरपालिकेच्या कामोठे विभागातून त्यांना ही राजकिय वळणावर संधी मिळाली. कामोठे भाजपचे शहर अध्यक्ष म्हणून त्यांना जबाबदारी मिळाली.

माझा मुलगा भाजपत असताना त्यांची मोठी सलगी जमली हळूहळू माझेही संबंध दृढ झाले ते आज तागायत. दवाखान्याच्या व्यवसायाकडे दुर्लक्ष न करता मिळेल त्या वेळी पक्षीय काम व सामाजिक कामाकडे वाहून घेतले त्याचे फळ त्यांना मिळाले. पनवेलच्या पहिल्या महापालिकेच्या निवडणूकित भाजपची उमेदवारी त्यांना मिळाली तीही मी रहातो त्या प्रभागात. अटीतटीचा आणि प्रतिष्ठेचा सामना होता, परंतु डॉ. भगत विजयी झाले. यात माझ्या मुलासह सर्व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. लोकांनी दिलेल्या अशीर्वादाला ते जागले आणि लोकप्रियेतेच्या शिखरावर पोहचले.



पाणी, वीजपुरवठा करणे, साफसफाई, नाले, गटारे बांधणे फूटपाथ बनवणे, अंतर्गत रस्ते बनविणे, विभागात शांतता ठेवणे आपसातील वादावादी मिटवून सामाजिक सलोखा ठेवणे, झाडे लावणे गार्डन बनविणे, प्रवासी बस सुरू करणे अशी विविध प्रकारची कामे करताना डॉ.भगत कुठेही मागे पडलेले नाहीत. सिडको आणि आता पनवेल महापालिकेच्या माध्यमातून सामाजिक कामांची पर्वणी त्यांच्या कार्यात दिसून येते. सत्ता असतानाच कामे करता येतात नाही तर नाही हा गैरसमज डॉ.भगतने मोडून काढला आहे. आज ते माजी नगरसेवक आहेत, परंतु त्यांची लोकप्रियता व कामाचा सपाटा तसूभरही कमी झाला नाही. पक्षीय काम करतांना सामान्य कार्यकर्त्यांसारखे, दुसऱ्याचे शांतपणे ऐकून घेण्याचा आणि आपुलकीचा मंत्र डॉ भगतकडून शिकावा. नम्रपणा हा मुळ स्वभाव, सामाजिक कामाचा रात्रंदिन कंटाळा नाही, टोलवाटोलवी नाही, कधी कोणाला रागावून वैतागुन बोलण्याचे मला तरी आढळून आले नाही.

नगरसेवक काळात आणि नगरसेवक नसताना सामाजिक कामाच्या जोरावर अनेक प्रश्न सोडविले आहेत, अशी गोडबोली कला थोडयाच लोकात दिसून येते त्यातील डॉक्टरांचा वरचा क्रमांक लागेल असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांना प्रत्येक कार्यक्रमाला आवर्जून बोलावलं जातं. म्हणून नामकरण समारंभ, हळदी समारंभ, लग्न समारंभ, क्रिकेट सामने तसेच हॉस्पीटल, दवाखाना, दुकान, नवीन घर पायाभरणी, दोन चाकी, चार चाकी वाहनांची शोरुम, भूमीपुजन, वृक्षारोपन सारख्या नाना कार्यक्रमास उद्घाटक म्हणून आपला हक्काचा माणूस म्हणून पनवेल मनपा व रायगड जिल्ह्यात आवर्जून लोक बोलवतात.

नवी मुंबई विमानतळास दि.बा. पाटील साहेबांचे नाव मिळावे तसेच जी जी सामाजिक भावना प्रधान आंदोलने झाली त्यात डॉ. भगत यांचा सहभाग पाहवयास मिळाला. कोरोना महामारीत देशच होरपळून निघाला होता माणसे माणसाला बोलत नव्हती, शिवू देत नव्हती अशा कठिण प्रसंगात अनेक पेशंटना सरकारी किंवा खासगी रुग्णालयात प्रवेश देण्यासाठी आपल्या जीवाची, कुटुंबाची पर्वा न करिता रात्री बेरात्री फोन आला तर लगेच उचलणार आणि आजारी माणसाला वाचविण्यासाठी संबंधीत हॉस्पिटलला फोन करणार ही माझी ऐकीव माहिती नाही तर मीही त्यातला कोरोना पिडीत आहे रात्री दोन वाजल्यापासून ते पहाटे ५ वाजेपर्यंत त्यांनी मला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले, म्हणून मला आज त्यांच्या बद्दल लिहिता आले. बंदी असताना अडकून लोकांना इकडंचे तिकडे आणि तिकडचे इकडे सुखरूप आपल्या घरी यावेत म्हणून प्रयत्न केले. जमेल तसं लोकांना अन्नधान्य जीवनाश्यकाचा पुरवठा केला. त्या काळातील देवदुता सारखी कामगिरी केली हे नाकारू शकत नाही. कोणते औषधे कसे घ्यावेत, काय काय घरगुती उपाय करावेत याचे मार्गदर्शन अनेकांना तर केलेच पण घाबरलेल्या माणसाला धिर देण्याचे महत्वाचे काम केले आहे.

सामाजिक प्रश्नाला न्याय मिळावा म्हणून संबंधीत यंत्रणेला पत्र व्यवहार करणे प्रसंगी वर्तमान पत्रातून इशारा देणे मग ती सिडको असो किंवा पनवेल मनपा. कामोठे शहरात गटारांवरील तुटलेली झाकणे बदलण्याचे अथवा फुटलेली गटारे दुरुस्त करण्यासाठी, पावसाळ्यात रस्त्यावर पडलेली झाडं, रस्ते दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, कचरा व्यवस्थापन याची पहाणी करणे आणि संबंधीत यंत्रणेला कळविणे यात हातखंडा असलेला हा नगरसेवक. लोकांना नगरसेवकाकडून ज्या अपेक्षा असतात त्या पूर्ण करण्याचा कटाक्ष असलेला हा नगरसेवक. डॉ भगत म्हणजे लोकांनी विश्वास ठेवून नगरसेवक कसा असावा याचे ज्वलंत उदाहरण म्हणून डॉ अरूणकुमार भगत यांचे नाव आहे. त्यांना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!

**-उत्तमराव गायकवाड, कामोठे**

# श्रीवर्धनच्या वाहतूककोंडीवर कायमचा उपाय हवा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन, रायगड जिल्ह्यातील एक अत्यंत ऐतिहासिक आणि लोकप्रिय पर्यटन स्थळ, आजकाल वाहतूक कोंडीच्या गंभीर समस्येने ग्रासले आहे. या ठिकाणाचे सौंदर्य, समुद्र किनारे, आणि धार्मिक स्थळे पर्यटकांना आकर्षित करतात, परंतु वाढत्या पर्यटकांच्या संख्येमुळे स्थानिक रस्त्यांवर वाहतूक जाम होणे हे एक मोठे आव्हान ठरले आहे. विशेषतः शिवाजी चौक, सावरकर मार्ग, बाजारपेठ आणि बस स्थानक परिसरातील वर्दळीचा गोंधळ दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे. वाहनांची लांब रांग, असुरक्षित रस्ते, आणि वहातुक जामच्या समस्येमुळे पर्यटक तसेच स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत.



श्रीवर्धनमधील वाहतूक कोंडीचा प्रश्न त्वरित आणि ठोस उपाययोजनांद्वारे सोडवला पाहिजे. यासाठी रस्त्यांचे रुंदीकरण, पार्किंग सुविधा वाढवणे, वर्दळीचे नियंत्रण आणि रोडवायडींग सारख्या उपाययोजनांचा अवलंब करणं अत्यंत गरजेचं आहे. या उपाययोजना प्रभावीपणे लागू करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भूसंपादन आवश्यक आहे, ज्यासाठी नगरपरिषदेच्या निधीची कमतरता आहे. यावर उपाय शोधून तातडीने निधी मिळवून भूसंपादनासाठी पुढाकार घेणं महत्त्वाचं ठरेल.

योग्य उपाययोजना केल्यास वाहतूक कोंडीवर मात केली जाऊ शकते, तर पर्यटन क्षेत्रातील वृद्धीला देखील चालना मिळेल.श्रीवर्धनच्या विकासात खासदार सुनील तटकरे यांचे योगदान उल्लेखनीय आहे. ते विविध विकास प्रकल्पांसाठी निधी आणि मदत मिळवून या परिसरात अनेक चांगले बदल घडवून आणत आहेत. श्रीवर्धनच्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर देखील त्यांच्या नेतृत्वाखाली योग्य उपाययोजना होईल, नागरिक आणि पर्यटक यांचा विश्वास आहे की, त्यांच्या नेतृत्त्वाखाली श्रीवर्धनमधील वाहतूक कोंडीच्या समस्येवर त्वरित उपाययोजना होईल आणि त्या उपायांमुळे पर्यटन क्षेत्राची भरभराट होईल. यामुळे स्थानिकांचे जीवनमान सुधारेल आणि आर्थिक दृष्ट्या देखील नवा संधी निर्माण होईल.

पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्र असलेल्या श्रीवर्धनच्या पर्यटन क्षेत्राच्या समृद्धीसाठी ही वाहतूक कोंडीच्या समस्येची तातडीने सोडवणूक आवश्यक आहे. यामुळे श्रीवर्धनला एक नवी ओळख आणि स्थानिक नागरिकांना सकारात्मक बदलांचा अनुभव मिळेल.

# कर्जतला मालगाडीचे इंजिन घसरल्याने गाड्यांचा खोळंबा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्थानकातून पुण्याकडे जाणाऱ्या रेल्वे लाईनवर एक नंबर फलाट संपल्यावर यार्डात जाणाऱ्या मालगाडीचे इंजिन घसरल्याने पुण्याकडे जाणाऱ्या लांब पल्ल्यांच्या गाड्यांना थोडा उशीर झाला. ही घटना सोमवारी संध्यकाळी पावणे पाचच्या सुमारास घडली. सव्वा चार तासात इंजिन पुन्हा रुळावर आणण्यात यश आल्याने रेल्वे वाहतूक पूर्ववत झाली.



मुंबई, कल्याण, पनवेलहून पुण्याकडे जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्या थांबा असो वा नसो कर्जत स्थानकात डबल इंजिन लावण्यासाठी एक नंबर फलाटावर येऊन थांबतात. आज चार वाजून सत्तेचाळीस मिनिटांनी एक मालगाडी एक नंबर फलाटावरून जात होती. फलाट संपल्यावर लगेचच या मालगाडीचे इंजिन रुळावरून घासरले आणि हा रेल्वे मार्ग बंद झाला.

त्यामुळे मुंबई – पुणे प्रगती एक्स्प्रेस कर्जत स्थानकाच्या अलीकडे तब्बल पंचविस मिनिटे थांबविण्यात आली. त्यानंतर ही गाडी दोन क्रमांकाच्या फलाटावर आणण्यात आली. तिच्या मागोमाग येणारी मुंबई – पुणे डेक्कन क्किन आणि मुंबई पुणे सिंहगड एक्स्प्रेस सुध्दा दोन नंबर फलाटावर आणल्याने या गाड्यांना थोडा उशीर झाला. घसरलेले इंजिन पुन्हा रुळावर आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू होते. तब्बल सव्वा चार तासांनी म्हणजे नऊच्या सुमारास हे इंजिन रुळावर आणण्यात रेल्वे कर्मचाऱ्यांना यश आले. त्यानंतरच्या गाड्या नेहमी प्रमाणे एक नंबर फळटावरून पुण्याकडे रवाना करण्यात आल्या.

## अमृत सरोवर येथे ध्वजवंदन

**चौक : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील चौक गावातील अमृत सरोवर येथे ज्येष्ठ नागरिक अशोक शिवलाल शहा यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

या वेळी सरपंच रितू ठोंबरे, ग्रामसेवक शंकर जाधव, उपसरपंच सुभाष पवार, अजिंक्य चौधरी, वृषाली पोलेकर, पूजा हातमोडे, निखिल मालुसरे, हलधर म्हात्रे, व्ही टी कुंभार, अंकुश वाघ, कल्पना शिंगवा, कीर्ती शहा, संदीप पारठे, राजेंद्र पवार, चेतन मालुसरे, सुनीता मालुसरे, लक्ष्मी वाघ पंकज शहा व ग्रुप ग्रामपंचायत कर्मचारी व सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर येथील विद्यार्थिनी विद्यार्थी उपस्थित होते.



## रोह्यात ठाकरे गटाला धक्का; शाखाप्रमुख आणि महिला पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादीमध्ये जाहिर प्रवेश

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील राजकीय दृष्ट्या बलाढ्य अशी तळाघर ग्रामपंचायत म्हणून ओळखले जाते . या ग्रामपंचायतीमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेतृत्व करणारे शाखाप्रमुख जयेश माने व महिला सक्षमीकरणासाठी झटणाऱ्या धाटाव विभागातील सामाजिक क्षेत्रात धडाडीच्या महिला कार्यकर्त्या संजीवनी माने यांचा खासदार सुनिल तटकरे यांच्या उपस्थितीत गिता बाग सुतारवाडी येथे जाहीर पक्ष प्रवेश झाला तर संजीवनी माने यांची थेट महिला राष्ट्रवादी उपाध्यक्षपदी नियुक्तीपत्र देत खासदार तटकरे यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.



राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्री अदिती तटकरे यांच्या महिला सक्षमीकरण कामाच्या प्रेरणेतून व युवकांचे प्रेरणास्थान माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या प्रयत्नातून आपण प्रवेश राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा प्रितम पाटील, विभागीय अध्यक्ष दत्ता चव्हाण, महेश बामुगडे, तळाघर ग्रामपंचायत उपसरपंच संतोष माने, सदस्य रुपेश शिंदे, सदस्य नथुराम माने व संतोष चव्हाण, रुपेश बामुगडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## दिव्यांगानी जिंकली खोपोली व रायगडकरांचे मने



**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलीस दलातर्फे भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त दृश्यशक्ती ट्रस्टच्या दिव्यांग कलाकारांनी देशभक्तीपर गीत आणि नृत्याचा कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली. गणेश वंदनेने सुरुवात झालेल्या कार्यक्रमाची ए मेरे वतन के लोगो या सुमधुर गीताने सांगता झाली.

न्यायमूर्ती राजेश खंदारे, खालापूर, सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक रायगड, विक्रम कदम,उपविभागीय पोलीस अधिकारी, खालापूर, लायन्स क्लब ऑफ खोपोलीचे अध्यक्ष दीपेंद्र बदोरिया, शॉलम एज्युकेशन ट्रस्टच्या श्रीमती पाटणकर यांच्या प्रमूख उपस्थितीत खालापूर तालुक्यातील खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शितल राऊत, खालापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन पवार आणि रसायनी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. खोपोली शहरातूनच नव्हे तर संपूर्ण रायगडातून पोलीस अधिकारी त्याच प्रमाणे अनेक मान्यवर संस्था आणि रसिकांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती.

गीता पोडवाल संस्थापक अध्यक्ष दृश्यशक्ती ट्रस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली हम किसीसे कम नही या रंगारंग कार्यक्रमाची मांडणी केली होती. दिव्यांग कलाकारांच्या कलागुणांच्या अविस्मरणीय सादरीकरणाने अक्षरशः डोळ्याचे पारणे फिटले, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत होती.

## प्रजासत्ताक दिनी माझी वसुंधरा ५.० ची थीम

### ग्रामपंचायत चौकचा स्तुत्य उपक्रम



**चौक: प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त ग्रुप ग्रामपंचायत चौक यांनी माझी वसुंधरा हे अभियान यशस्वी करण्यासाठी संपुर्ण दिवस जनजागृती साठी नव नविन उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन हा एका वेगळ्या प्रकारे साजरा करण्यात आल्याने ग्रुप ग्रामपंचायत चौक हद्दीतील सर्व ग्रामस्थ माझी वसुंधरा ५.० हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून आले.

माझी वसुंधरा अभियान ५.० हे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग चा उपक्रम आहे.पंच महाभुतावर म्हणजे भूमी, वायु, जल, अग्नी, आकाश या पंचमहाभूतांवर आधारित पाच निर्देशक विकसित करण्यात आले आहेत.निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आणि वायू मंडळात प्रदूषित होत असलेल्या वसुंधरेच रक्षण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ग्रुप ग्रामपंचायत चौक यांनी सर्वांच्या सहकार्याने नव नविन कल्पना रुजवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

शाळा व कनिष्ठ महाविद्यालय येथे माझी वसुंधरा अंतर्गत वकृत्व स्पर्धा,निबंध स्पर्धा, घोष वाक्य, चित्र कला स्पर्धा अशा माध्यमातुन विद्यार्थी यांच्या मार्फत जनजागृती करताना त्यांना प्रोत्साहित देखील करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.विद्यार्थी, ग्रामस्थ यांच्यासाठी सेल्फी पॉइंट देखिल उभा करण्यात आला आहे.


माझी वसुंधरा ५.० हे अभियान यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी,ग्रामस्थ,पर्यावरण प्रेमी, अभ्यासक यांचे सहकार्य घेण्यात येत असून सर्वांचा प्रतिसाद अतीशय उत्साह वाढविणारा आहे असे सरपंच रितू ठोंबरे यांनी सांगितले. माझी वसुंधरा ५.० माध्यमातून करण्यात येत असलेले उपक्रम याचा विचार करता येत्या काळात चौक ग्रामपंचायत पंच महाभुतांच्या आधारावर परिसरातील वातावरण पोषक निर्माण करेल असे ग्राम पंचायत अधिकारी एस पी जाधव यांनी सांगितले, विशेष म्हणजे ग्राम पंचायत कर्मचारी यासाठी अहोरात्र मेहनत घेताना दिसत आहेत.

## अवघ्या सात वर्षांची शर्विकाने सर केला दुर्ग लिंगाणा

**अलिबाग : प्रतिनिधी**

सात वर्षाच्या चिमुकलीची १२१ व्या गडाला गवसणी घातली आहे. जागतिक विक्रमवीर आणि महाराष्ट्राची हिरकणी म्हणून प्रसिद्ध असलेली रायगड जिल्ह्यातील अलिबागची कन्या शर्विका अमृता जितेन म्हात्रे हिने प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येलाच आणखी एक चमकदार कामगिरी केली आहे. महाराष्ट्रातील सर्वात कठीण दुर्ग म्हणून ओळखला जाणारा लिंगाणा तिने सर केला आहे.

सह्याद्री डोंगररांगेतील पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या दुर्गम वाटेवर असलेला हा दुर्ग स्वराज्याचे कारागृह म्हणून देखील प्रसिद्ध आहे,या गडाच्या पायथ्याशी जाणारी वाट देखील थरारक आहे. परंतु या सर्व गोष्टींवर मात करत शर्विकाने ही मोहीम फत्ते केली आहे.या मोहिमेत तिच्यासोबत १६ गिर्यारोहकांचा देखील समावेश होता.



कठीण गडांच्या मोहिमेसाठी शर्विका राजे शिवाजी वॉल क्लाइंबिंग,पुणे या संस्थेच्या माध्यमातून अमोल जोगदंड आणि मांतू मंत्री या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाने गेल्या दोन वर्षापासून सातत्याने प्रशिक्षण घेत आहे या प्रशिक्षणामुळेच तिला या मोहिमेत आत्मविश्वास मिळण्यास मदत झाली तसेच एस एल ॲडव्हेंचर, पुणे या संस्थेने एव्हरेस्ट वीर लहू उघडे यांच्या माध्यमातून या मोहिमेचे आयोजन केले होते.याच संस्थेतील गिर्यारोहक तुषार आणि केदार यांच्या माध्यमातून ही मोहीम विविध सुरक्षा उपकरणांच्या साहाय्याने यशस्वीपणे पार पडली.

या मोहिमेनंतर पुन्हा एकदा शर्विकाने आपले नाव सह्याद्रीच्या प्रवासात अधोरेखित केले आहे त्यामुळे तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## सेवा निवृत्तांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याची मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

पुरोगामी महाराष्ट्र राज्य शासनाने सेवा निवृत्तांचीसंख्या लक्षात घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सेवा निवृत्तां साठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करावे तसेच प्रशासनाने संवेदनशील होऊन निवृत्तांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्याचे आवाहन रायगड जिल्हा सेवा निवृत्त संघटनेचे अध्यक्ष धुरंधर मढवी यांनी केले.

मुरुड येथे मुरुड तालुका सेवा निवृत्त संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना धुरंधर मढवी बोलत होते.आपल्या भाषणात ते म्हणाले की, केंद्रीय निवृत्तां प्रमाणे दरमहा १००० रुपये वैद्यकिय भत्ता मिळाला पाहिजे , तसेच ज्येष्ठांना सेवा निवृत्तांप्रमणे वयोपरत्वे केंद्रीय वाढीचे दराने लाभ मंजूर करावेत आणि निवृत्त धारकांवर अवलंबुन कुटूंबातील अविवाहित मुली , घटस्फोटित मुली तसेच दिव्यांग मुलींना कुटुंब निवृत्ती वेतनाच्या आदेशानुसार त्यांना निवृत्ती वेतन सुरु करावे अशी मागणी केली .

या वेळी व्यासपीठावर अध्यक्ष धुरंधर मढवी, रविंद्र पाटील , सुरेंद्र जाधव, तालुका संघटनेचे अध्यक्ष नयन कर्णिक, उपाध्यक्ष शकील कडू , कोषाध्यक्ष गजानन पाठक , सचिव उल्हास भगत, डॉ मकबुल कोकाटे , प्रा . एम .एस जाधव ,बाळकृष्ण कासार ,रविंद्र जंजिरकर , विलास जगताप, उषा खोत , नैनिता कर्णिक, सुगंधा दळवी , रमेश कवळे, भाई मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते .

संघटनेचे अध्यक्ष नयन कर्णिक यांनी संघटना निवृत्तांचे प्रश्न सोडविण्या साठी कटिबद्ध असल्याचे सांगुन संघटीत राहण्याचे आवाहन केले सेवा निवृत्ती विषयी काही सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मढवी यांनी समर्पित उत्तरे देऊन शंका समाधान केले .तालुक्यातील ४० गावांतील महिला पुरुष निवृत्ती धारक उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उषा खोत यांनी तर आभार प्रदर्शन शकील कडू यांनी केले.



## अंडर-१९ टी-२० महिला विश्वचषक

# भारतीय संघाची सेमीफायनलमध्ये धडक

## स्कॉटलंडचा १५० धावांनी पराभव



**मलेशिया : वृत्तसंस्था**

मलेशियामध्ये सुरू असलेल्या अंडर-१९ टी-२० महिला विश्वचषकात टीम इंडियाने शेवटचा सुपर सिक्स लीग सामना १५० धावांनी जिंकला आणि उपांत्य फेरीत धडक मारली आहे.

भारताच्या महिला संघाची अंडर १९ टी-२० महिला विश्वचषकात विजयी घोडदौड कायम आहे. सुपर सिक्स फेरीतील अखेरच्या सामन्यात भारतीय संघाने स्कॉटलंडचा एकतर्फी पराभव केला. भारतीय संघाने हा सामना तब्बल १५० धावांनी जिंकला. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने २०८ धावांची मोठी विक्रमी धावसंख्या उभारली आणि प्रत्युत्तरात स्कॉटलंडचा संघ अवघ्या ५८ धावांत गारद झाला. यासह भारतीय संघाने १९ वर्षांखालील टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे.

टीम इंडियाच्या विजयाची शिल्पकार ठरली गोंगडी त्रिशा, जिने प्रथम ५९ चेंडूत ११० धावांची वादळी खेळी केली आणि त्यानंतर भारताच्या गोलंदाजांनी आपल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर पुन्हा एकदा प्रतिस्पर्धी संघाला नेस्तानाबूत केलं.

भारतीय संघाने स्कॉटलंडचा अखेरच्या सुपर सिक्स सामन्यात एकतर्फी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारताची सलामीवीर जी कामिलीनी आणि गोंगडी त्रिशा यांनी शतकी भागीदारी केली. दोन्ही फलंदाजांनी पहिल्या विकेटसाठी १४७ धावांची विक्रमी भागीदारी केली. कामिलिनीने ४२ चेंडूत ५१ धावा केल्या. मात्र त्रिशाने विस्फोटक फटकेबाजी करत १३ चौकार आणि ४ षटकारांच्या जोरावर ११० धावा केल्या, ती शेवटपर्यंत नाबाद राहिली. महिला अंडर-१९ टी-२० विश्वचषकात शतक झळकावणारी त्रिशा पहिली क्रिकेटपटू ठरली. तिच्या शतकाच्या जोरावर टीम इंडियाने २० षटकांत २०८ धावा केल्या, जी या स्पर्धेतील विक्रमी धावसंख्या आहे.

# रामशेठ ठाकूर विद्यालयाचे नमो चषक स्पर्धेत सुयश





**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा पनवेल व उरण यांच्या विद्यमाने नमो चषक स्पर्धेचे आयोजन रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरी, उलवे या ठिकाणी करण्यात आले होते.

पनवेल व उरण मधील उद्योन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे तसेच विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या क्रीडा गुणांना संधी मिळून भविष्यातील उत्तम दर्जाचे राष्ट्रीय खेळाडू घडावेत या उदात्त हेतूने खो-खो, कबडडी व मैदानी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालय, खारघर-ओवेपेठ विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मैदानी स्पर्धेत सहभाग घेतला होता. भाला फेक स्पर्धेत विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करीत सुयश मिळविले आहे. यामध्ये १४ वर्षाखालील मुलांच्या गटात राशिद शब्बीर खान (आठवी) याने प्रथम क्रमांक मिळविला त्यास सुवर्ण पदक, प्रमाणपत्र व २००० रुपये रोख बक्षिस देण्यात आले. याच गटात दिपेश तुकाराम पगडे (आठवी) याने तृतीय क्रमांक मिळविला त्यास कांस्य पदक, प्रमाणपत्र व ५०० रुपये रोख बक्षिस देण्यात आले. १७ वर्षाखालील मुलींच्या गटात जिया गुरुनाथ वासकर (दहावी) हिने प्रथम क्रमांक मिळविला तिला सुवर्ण पदक, प्रमाणपत्र व ३००० रुपये रोख बक्षिस देण्यात आले. याच गटात भूमी लक्ष्मण वासकर (दहावी) हिने व्दितीय क्रमांक मिळविला तिला रजत पदक, प्रमाणपत्र व २००० रुपये रोख बक्षिस देण्यात आले. १७ वर्षाखालील मुलांच्या गटात विद्यालयातील सर्वोत्कृष्ट भाला फेक पटटू आकाश राजेश सहानी (नववी) याने व्दितीय क्रमांक मिळविला त्याला रजत पदक, प्रमाणपत्र व २००० रुपये रोख बक्षिस देण्यात आले.

या बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या समारंभस्थळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजपा तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बक्षिस देवून गौरविण्यात आले. या भाला फेक स्पर्धेत सर्वाधिक एकूण पाच बक्षिसे मिळविण्याचा बहुमान विद्यालयाने मिळविला आहे. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक संभाजी जाधव, प्रवीण पाटील, मंदार मुंबईकर यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या चमकदार कामगिरी बद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महानगरपालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, संस्थेचे सचिव एस.टी. गडदे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य प्रभाकर जोशी तसेच उच्च माध्यमिक विभागाच्या प्राचार्या निशा नायर व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष खांदेकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# शिवाजीनगरमध्ये ध्वजारोहण आणि क्रिकेट स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवाजीनगरमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त गाव कमिटी अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण आणि आयोजित क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाला पी.के. ठाकूर, जी.के.ठाकूर, टी. के.ठाकूर, व्ही. के ठाकूर, भास्कर पाटील, पांडु कडू, सुरेश ठाकूर, किशोर ठाकूर, दर्शन ठाकूर, जगदीश ठाकूर, बाळकृष्ण ठाकूर व शिवाजीनगरचे भटजी न्याना, शिरीष कडू, धनाजी ठाकूर, श्रीधर ठाकूर, अमृत ठाकूर, विजय ठाकूर, संदीप ठाकूर, राधाताई ठाकूर, मंदा ठाकूर तसेच समस्थ ग्रामस्थ शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, उलवे नोड शिवाजी महाराज मैदानात क्रिकेट सामने आयोजित करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन कृष्णाशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आदेश स्पोर्ट्सचे खेळाडू आणि ४० प्लसचे खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## श्रावणी केणीचे क्रीडा स्पर्धेत सुयश



**उरण : बातमीदार**

मुंबई येथे अथलेटिक्स स्पोर्ट्स फॉउंडेशनच्या माध्यमातून राज्यस्तरीय ट्रॅक नाईट्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत उरण तालुक्यातील नागाव ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी किरण केणी यांची कन्या श्रावणी केणी हिने धावण्याच्या स्पर्धेत ८०० मीटर मध्ये ब्राँझ पदक तर सांघिक रिले मध्ये गोल्ड मेडल पटकाविले आहे.

श्रावणी हिने उलवे येथे झालेल्या राज्यस्तरीय नमो चषक स्पर्धे मध्ये १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सिल्वर मेडल पटकाविले आहे. श्रावणी किरण केणी हिने केलेल्या क्रीडा क्षेत्रातील नेत्रदीपक कामगिरीमुळे तिचे सर्वत्र कौतुक होत असून सर्वच स्तरातून तिच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अन्विका निंबाळकरचे जलतरण स्पर्धेत यश



**उरण : रामप्रहर वृत्त**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विजय विकास सामाजिक संस्था यांनी उरण येथे रायगड जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेच आयोजन केले होते.

या स्पर्धेत अन्विका निंबाळकर हिने ६ वर्षा खालील गटामध्ये २५ मीटर फ्री स्टाईल, बॅक स्ट्रोक, बटरफ्लाय, ब्रेस्ट स्ट्रोक या ४ ही प्रकारात प्रथम क्रमांक (गोल्ड मेडल) पटकावत चॅम्पियन ट्रॉफी वर आपले नाव कोरले. यासाठी तिला कर्नाळा स्पोर्ट अकादमी पनवेलचे नामांकित प्रशिक्षक समर्थ नाईक यांचे खूप चांगले मार्गदर्शन लाभले.




# जलतरण पट्टू ऋग्वेद कुथेची चमकदार कामगिरी



**रोहे : प्रतिनिधी**

ठाणे जिल्हा जलतरण असोसिएशनच्या वतीने भिवंडी येथे १९ जानेवारी रोजी अरेना स्पोर्ट्स क्लब येथे जिल्हास्तरीय धर्मराज चषक स्वीमिंग चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत विविध गटातील असंख्य जलतरण पट्टूनी भाग घेतला होता. या पैकी ६ वर्ष वयोगटात रोह्यातील जे. एम. राठी स्कुलचा विद्यार्थी ऋग्वेद दिनेश कुथे याने चमकदार कामगिरी करत दोन सिल्व्हर व एक ब्रॉन्झ मेडल मिळविले.

ऋग्वेद कुथे हा गेली दोन वर्ष जिल्हा व राज्यस्तरावर आपल्या क्रीडा कौशल्याने नाव कमवीत आहे. त्याच्या यशामागे त्याच्या शाळेचे शिक्षक, मुख्य प्रशिक्षक भूषण शिर्के सर, मार्गदर्शक निखिल शिंदे यांचे विशेष योगदान आहे. ऋग्वेद कुथे याने ठाण्यातील जलतरण स्पर्धेत उत्तुंग कामगिरी केल्याबद्दल त्याचे सर्व रोहेकर जनतेतून कौतुक व अभिनंदन होत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com